मंगळवार, ०३ जानेवारी २०२३
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१३६
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● TUESDAY 03 JANUARY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-136 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5



## सावित्री माय

आधुनिक केसरी

सरस्वती कधीच दिसली नाही
तू मात्र प्रत्यक्ष होतीस समोर..
अवती भवती दाटला होता
अज्ञानाचा अंधार किती काळा भोर..

भेद देऊन वाईट परंपरांना
खुल केलंस आमचं आकाश..
माय तुझ्या मुळेच आहे
आज आमच्या जीवनी प्रकाश..

अनाथांची झालीस ग तू आई
सहन केले किती वनवास..
तू नसलीस तेव्हा तर
असता आमच्या गळ्याशी फास..

ज्ञानाची देवी तूच खरी
तूच आमुची प्रेरणा शक्ती..
म्हणूनच तुझ्या पायावर असेल
आमची कायम प्रेमळ भक्ती

उंच मानेने जगणे शिकवले
आमचे खरे अस्तित्व बनवले
सावित्रीमायी फक्त तुझ्याच मुळे
भविष्य आमचे उज्वल झाले..!

सुजाता नवनाथ पुरी
जि.प. प्राथमिक शाळा वडगाव गुप्ता,
ता. जि. अहमदनगर
मो. 8421426337

# सावित्रीबाईंच्या लेकींची फक्त एक रुपयांवर बोळवण

## 30 वर्षांपासून जि.प. शाळांत मुलींना दररोज फक्त एक रुपया उपस्थिती भत्ता

आधुनिक केसरी न्यूज

**संदीप मानकर**

**सिल्लोड :** दारिद्र्यरेषेखालील तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील अनुसूचित जाती जमाती व भटक्या जमातीतील इयत्ता पहिली ते चौथी पर्यंत शिकणाऱ्या मुलींची पटसंख्या वाढविण्यासाठी शासनाकडून प्रति विद्यार्थिनी एक रुपया प्रतिदिन प्रोत्साहन उपस्थिती भत्ता देण्यात येतो. गत 30 वर्षांपासून सुरु केलेल्या या प्रोत्साहन पर भत्त्यात सरकारने आतापर्यंत एका पैशाचीही सुद्धा वाढ केली नाही. सावित्रीबाई फुले यांच्या नावे सुरू केलेल्या योजनेतील प्रोत्साहन भत्ता वाढविण्याचा प्रयत्न शिक्षण विभागांसह लोकप्रतिनिधी यांच्याकडून होत नसल्याने विद्यार्थिनींचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.




जिल्हा परिषद शाळांतील उपस्थिती वाढविण्यासाठी 1992 साली तत्कालीन सरकारने प्रति विद्यार्थिनी एक रुपया प्रतिदिन प्रोत्साहन भत्ता देण्याचा निर्णय घेतला होता. मुलींसाठी पहिली शाळा सुरू करणाऱ्या क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने शासनाने ही योजना सुरु केली, परंतु 30 वर्षानंतरही सावित्रीच्या लेकींची बोळवण मात्र एका रुपयानेच केली जात आहे.

आज महागाईने कळस गाठला असून शैक्षणिक साहित्याच्या किंमती सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. पेनमधील कांडीची किंमत देखील एक रुपया पेक्षा जास्त आहे. तरीही आजपर्यंत कोणत्याच सरकारने विद्यार्थिनींच्या भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय घेतला नाही. दारिद्र्यरेषेखालील अनुसूचित जाती जमातीतील पहिली ते चौथीच्या वर्गातील मुलींना उपस्थितीसाठी एक रुपया प्रतिदिन भत्ता देण्यात येतो. सावित्रीबाई फुले यांच्या नावाने सुरु केलेल्या योजनेचे मागील वर्षी हे रौप्य महोत्सवी वर्ष होते. तेंव्हा देखील भत्त्यात वाढ करण्याचा विसर सरकारला पडला. आजही मुलींना 30 वर्षांपूर्वीचाच प्रोत्साहन भत्ता देण्याचा निर्णय म्हणजे तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार आहे. एकीकडे 1992 पासून आजतागायत या प्रोत्साहन भत्त्यात कोणतीही वाढ झाली नाहीये तर दुसरीकडे हा रुपया देखील वेळेवर मिळत नसल्याची बाब समोर आली असल्याने पालक वर्गांत तीव्र नाराजीचा सूर उमटला आहे. म्हणून शासनाने पालकांची थट्टा थांबवावी अशी मागणी पालक वर्गातून केली जात आहे.

विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या प्रोत्साहन पर भत्त्यात नक्कीच वाढ व्हायला हवी. परंतु वरिष्ठ पातळीवरुन देखील यांसाठी प्रयत्न केले जात नाहीत. लोकप्रतिनिधींनी व सोबतच पालकांनी सुद्धा यांसाठी नियमित पाठपुरावा करणे गरजेचे आहे.
– (**अनिल पवार, शिक्षणाधिकारी पंचायत समिती, सिल्लोड**)

महागाईच्या या जगात एक रुपयांत येते तरी काय? याचा शासनाने विचार करावा. आर्थिक निकषावर प्रोत्साहन भत्त्यात वाढ होणे गरजेचे आहे. किमान दहा रुपया तरी प्रतिदिन प्रोत्साहन भत्ता मिळावा गेल्या 30 वर्षांच्या काळात आमदार, खासदारांच्या भत्त्यात भरघोस वाढ झाली. वेतन आयोग लागू झाला. मात्र मुलींच्या शैक्षणिक भत्त्यात वाढ झाली नाही. शिक्षण विभाग फक्त एक रुपया प्रतिदिन देऊन आम्हाला आम्ही अत्यंत गरीब असल्याची जाणीव करून देत आहे. आणि शिवाय जो एक रुपया दिला जातो तो देखील दोन वर्षांपासून मिळालेला नाही.
– (**संजय यदमळ, पालक**)

# महाराष्ट्रात थंडीचा जोर वाढला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** नवीन वर्षाच्या पहिल्याच आठवड्यात भारतात थंडीची लाट पसरली आहे. पुढचे आणखी काही दिवस थंडी कायम राहील, असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तविण्यात आला आहे. थंडीच्या तडाख्याने महाराष्ट्रही चांगलाच गारठला आहे. उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहणाऱ्या थंड वाऱ्यामुळे वर्षाचा पहिलाच दिवस गारेगार गेला. मुंबईतही गेल्या काही दिवसांपासून कमालीची थंडी पडली आहे. त्यामुळे मुंबईकरांना सध्या मुंबईत राहुनच माथेरानचा फील येत आहे. सोमवारी मुंबईत 15.6 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली, तर कुलाब्यामध्ये 18.5 सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. रविवारी मुंबईचं तापमान हे 15.6 अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले. तर माथेरानमध्येही 15 अंश तापमानाची नोंद झाली आहे. राज्यभरातील अनेक शहरांमध्ये 11 ते 12 अंश तापमानाची नोंद झाली आहे. नवीन वर्षाच्या सुरुवातीपासूनच महाराष्ट्रातील किमान तापमानात घट होताना दिसत आहे. मुंबई, विदर्भासह उत्तर महाराष्ट्रातही गारठा वाढला आहे. उत्तर महाराष्ट्रासह लगतच्या भागात तापमानाचा पारा चांगलाच घसरला आहे. नागरिक शेकोटीचा आधार घेत आहेत. येत्या काही दिवसांमध्ये मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भाच्या काही भागात गारठा वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

# नोटबंदी वैधच!

## सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज


**नवी दिल्ली : मोदी सरकारने २०१६ साली घेतलेल्या नोटबंदीच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने आज मोठा निकाल दिला. केंद्र सरकारने घेतलेला नोटबंदीचा निर्णय वैधच आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. केंद्र सरकारच्या नोटबंदीच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या एकूण ५८ याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. या याचिकांवरील सुनावणीदरम्यान दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने ७ डिसेंबर २०२२ रोजी आपला निकाल राखून ठेवला होता.**





सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारने घेतलेल्या नोटबंदीच्या निर्णयाला वैध असल्याचे म्हटले आहे. केंद्र सरकारने ८ नोव्हेंबर २०१६ रोजी घेतलेला नोटबंदीचा निर्णय घटनाबाह्य नाही. हा निर्णय घेताना राबवण्यात आलेल्या निर्णय प्रकियेच्या आधारावर हा निर्णय अवैध असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही. तसेच आरबीआय कायद्यातील कलम २६ (२) हेदेखील असंवैधानिक ठरवले जाऊ शकत नाही, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे. न्यायमूर्ती बीआर गोसावी यांनी नोटबंदीसंदर्भातील निकालाचे वाचन केले. नोटबंदी आणि त्यामागील उद्दिष्टे (काळापैसा नष्ट करणे, दहशदवाद्यांना केला जाणारा निधीपुरवठा इत्यादी) यांच्यात संबंध आहे. हे उद्दीष्ट साध्य झाले किंवा नाही हा वेगळा मुद्दा आहे. नोटा बदलण्यासाठी देण्यात आलेला ५२ आठवड्यांचा कालावधी हा अवास्तव होता, असे म्हणता येणार नाही, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. आरबीआय ॲक्टच्या कलम २६ (२) नुसार केंद्र सरकारला कोणतेही मूल्य असलेल्या कोणत्याही नोटांचे निश्चलीकरण करण्याचा अधिकार आहे, असेही सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात म्हटले आहे. पाच सदस्यीय घटनापीठाने हा निकाल दिला आहे. या घटनापीठाच्या अध्यक्षस्थानी न्यायमूर्ती एसए नझीर होते. तर न्यायमूर्ती बी.आर. गवई, न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्न, न्यायमूर्ती एएस बोपण्णा आणि न्यायमूर्ती व्ही. रामसुब्रमण्यम हे या खंडपीठाचे अन्य सदस्य होते. हा निकाल बहुमताच्या आधारावर देण्यात आला असला तरी न्यायमूर्ती नागरत्न यांनी नोटबंदीचा निर्णय चुकीचा असल्याचे म्हटले आहे. ५०० तसेच १००० रुपयांच्या नोटांचे निश्चलीकरण करणे ही एक गंभीर बाब आहे. निश्चलीकरणाचा निर्णय केंद्र सरकारकडून केवळ राजपत्राद्वारे अधिसूचना जारी करून घेतला जाऊ शकत नाही, असे मत न्यायमूर्ती नागरत्न यांनी नोंदवले. या निर्णयप्रक्रियेत आरबीआयने स्वतंत्रपणे निर्णय घेतलेला नाही. आरबीआयने केवळ केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाला मंजुरी दिली. आरबीआयने जी कागदपत्रे सादर केली आहेत, त्यामध्ये 'केंद्र सरकारच्या इच्छेनुसार' असे नमूद करण्यात आले आहे. यावरून आरबीआयने स्वायत्तता दाखवलेली नाही, हे स्पष्ट होते. हा निर्णय अवघ्या २४ तासांत घेण्यात आला, असे निरीक्षण नागरत्न यांनी नोंदवले.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## आँखोंसे जो उतरी हैं दिलमें ...


आधुनिक केसरी

मुळातच हे ग्रंथ भक्तिरसाने ओतप्रोत भरलेले आहेत, त्यात सांगणाऱ्या बुवांची वाणी रसाळ आणि प्रासादिक असेल तर मग विचारायलाच नको. श्रोते त्या वर्षावात चिंब न्हाऊन निघतात. आताही माध्यम तेच असते. म्हणजे बुवांच्या समोर असलेला प्रासादिक ग्रंथ. पण त्या ग्रंथातील अक्षरे आता बुवांच्या हृदयातील ओलावा, आनंद, प्रसन्नता घेऊन ध्वनीचे रूप धारण करतात. आता त्यांचा हृदयात उतरण्याचा मार्ग बदलतो. डोळ्यांच्या ऐवजी ती कानावाटे प्रवेश करती होतात. कानावाटे हृदयापर्यंत पोहोचतात. पण परिणाम मात्र तोच असतो. आणि तो परिणाम म्हणजे दिव्यानंदाची अनुभूती. ज्ञानेश्वर माऊलींनी जेव्हा ज्ञानेश्वरी सांगितली आणि तेव्हा जे श्रोते हजर असतील, ते किती भाग्यवान म्हणावेत ! ते दृश्य जेव्हा मी कल्पनेने डोळ्यासमोर आणतो, तेव्हा मला दिसते ते मंदिर. माऊली खांबाला ( पैस ) टेकून बसल्या आहेत. समोर त्यांचे बोल आपल्या कानात



साठवून घेण्यासाठी चातकाप्रमाणे आतुर झालेला श्रोतृवर्ग बसलेला आहे. बाजूला निवृत्तीनाथ आहेत. माऊलींच्या दोन्ही बाजूला दोन समया प्रकाशमान आहेत. त्या समयांच्या प्रकाश माऊलींच्या मुखमंडलावर पडला आहे. मुळातच तेजस्वी असलेली माऊलींची मुद्रा त्या प्रकाशात आणखीनच दिव्य प्रकाशाने उजळून निघाली आहे. माऊलींच्या मुखातून आता अमृतासमान अशा एकेक ओव्या बाहेर पडताहेत. ओम नमोजी आद्याने सुरुवात झाली आहे. एकामागून एक निरनिराळी रूपके, उपमा घेऊन त्या ओव्या श्रोत्यांच्या हृदयाचा ठाव घेत आहेत. इथे श्रोत्यांची अवस्था फारच बिकट झाली आहे. हा आनंद किती आणि कुठे कसा साठवावा हे त्यांना उमजत नाही. जणू त्यांच्या सर्वांगाचे कान झाले आहेत. ज्ञानेश्वर माऊलींचे अमृतमयी बोल ते आपल्या हृदयात साठवून घेत आहेत. हृदयीचे हृदयी घातले अशी ही अवस्था ! तरी आता अवधान दिजे, मग सर्व सुखाते पात्र होईजे ' असे ज्ञानेश्वर माऊली म्हणतात ते उगीच नाही. महर्षी वाल्मिकींनी लिहिलेलं रामायण लव कुश यांनी जेव्हा श्रीरामांच्या दरबारात श्रीराम आणि श्रोत्यांसमोर

**क्रमशः**



## आनंदी पहाट

## सौंदर्यदृष्टी व उपयुक्तता ह्यांचा मिलाफ असावा

आधुनिक केसरी

आपल्या स्वप्नातल्या घराचं वेगळेपण अनुभवताना आणि त्यासाठी संरचना निवडताना आपल्या आशा, अपेक्षा, इच्छा. ईर्षा, उन्नती, संपन्नता यांच्या परिपूर्णतेसाठी प्रत्येक बाबींचा विचार करणं आवश्यक असतं. खरं म्हणजे, आपली आणि आपल्या कुटुंबाची खरी ओळख आपल्या घरावरूनच होत असते. या सर्व दृष्टिकोनातून वरील सर्व बाबी किती महत्वाच्या असू शकतात हे जाणून घेऊन आपली सजकता, सतर्कता आणि सौंदर्यदृष्टी यांचा मिलाफ आपण आपल्या जीवनात घडवून आणू शकतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

बदलत जाणारे जीवनमान आणि काळाची गरज म्हणून घराच्या बांधकाम पद्धतीत तसेच अंतर्गत सजावटीत देखील आमुलाग्र बदल घडत गेले आहेत. घराच्या बाबतीत केवळ निवारा असा माफक दृष्टिकोन राहिला नसून तो खूपच व्यापक झाला आहे. आपल्या घराचं स्वप्नं साकारताना आणि आपलं घर खास करून सजवताना आपण नेहेमीच चिकित्सक असतो. आपली "घर" या सज्ञेची व्याख्याच निराळी असते. आपलं घर म्हणजे जणू काही आपला श्वासच असतो. आपल्या प्रत्येकाची घराविषयीची संकल्पना आणि एकूणच घराच्या बांधकाम तसेच गृहसजावटीच्या बाबतीतली व्याख्याच वेगवेगळी असते. आपलं हक्काचं, स्वतःचं घर कल्पकतेने बांधण्याकडे, ते सजवण्याकडे प्रत्येकाचाच कल निराळा असतो.

पै पै जमवलेली जमापुंजी आपल्या स्वतःसाठी अथवा घरासाठी वापरताना आणि मुख्य म्हणजे ती मिळवताना तसेच जमवताना अनुभवलेल्या प्रत्येक क्षणाची आठवण आपल्याला झाल्याशिवाय राहात नाही. आपलं प्रत्येक स्वप्न साकार होत असताना आपल्याला मिळणारा आनंद निश्चितच निराळा असतो. पण हि स्वप्न साकारण्यासाठी आपल्या पैशाची यथायोग्य बचत करणंही तितकेच जरुरीचं असतं. सद्यःस्थितीत अनेकवेळा साधेपणा म्हणजे भोळेपणा किंवा गबाळेपणा समजला जातो.



आधुनिक केसरी

**मोक्षाचा सोहळा | परलोकी ||**
**कष्टाविना कैसी | यशप्राप्ती सांगा ||**
**विनाकष्टी सोंगा | अल्पकाळ ||१||**
**आभ्यासाचे व्रत | रूजता अंतरी ||**
**ज्ञान दृष्टी खरी | प्राप्त होय ||२||**
**थोरांचा आशिष | कल्याण साधतो ||**
**समाधान देतो | जन्मभर ||३||**
**ज्याची स्थिर वृत्ती | संयमाची मूर्ती ||**
**त्यासी यशकिर्ती | जगी लाभे ||४||**
**मायेचा ओलावा | भक्तीचा जिव्हाळा ||**
**मोक्षाचा सोहळा | परलोकी ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**थोडे पुढे गेल्यावर वाट चुकली असे ध्यानी आले तर मागे येण्यात कसलाच संकोच करण्याचे कारण नाही. अशावेळी लोकलज्जेचे ओझे बाळगून स्वतःवर अन्याय करण्याचा अधिकार निसर्ग देत नाही.**

**शेवटच्या श्वासापर्यंत आत्मविश्वास, आणि श्रद्धा यांची जोपासना तुमचा जीवनप्रवास सुसह्य करू शकते.**

## ।। दासबोध स्तवन ।।



## चतुर्दशब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

5व्या समासातील 12 व्या ओवी पर्यन्त आपण आलो होतो.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

समर्थ या समासात द्वेत व अद्वेत याची तुलना सांगतात. ते कसे आपण पाहुया. मन एकाग्र झाले तिथे "मी तू पणाची बोळवण झाली"सर्व मनाला द्वैताचा अनुभव येत रहातो ते मनच मुळीएकाग्र झाले कीद्वैत नाहीसें होऊन केवळ अद्वैत उरते. या ठिकाणी द्वैत व अद्वैतचे चिंतन देखील थांबते.थोडक्यात काय तर द्वैत व अद्वैत असा भेदभाव असण्याची मनाची अवस्था होय. ती व्रूती संपूर्णपणे नाहीशी झाल्यावर द्वैत रहात नाही. उन्मन अवस्था उन्मन हा शब्द उद् + मन मिळून बनतो। ऊद् म्हणजे ऊर्ध्व गति,श्रेष्ठगति,पूर्ण ता ,मुक्त करणे. उन्मन म्हणजे मनाची पूर्णावस्था होय. द्रुष्यातुन पूर्ण पणे बाहेर पडून ,मुक्त होऊन परमश्रेष्ठ ब्रम्हामध्ये विलीन होते तेव्हा त्याला ऊन्मन म्हणतात. साधे मन व्रुत्तीप्रधान, कल्पनामय असते तर उन्मन व्रुतविहीन कल्पनारहित असते.ज्या ज्ञानामध्ये व्रुत्तीला यत्किंचितही. स्थान नाही ते ज्ञान खरे ब्रम्ह ज्ञान होय. ते ज्ञानसंपूर्ण पणे समाधान देते ब्रम्ह ज्ञान मिळाल्यावर माया व ब्रम्ह यांचे यांचे चिंतनच संपते.

## मनाचे श्लोक

आधुनिक केसरी

**वसे हृदयीं देव तो जाण ऐसा।**
**नभाचे परी व्यापकु जाण तैसा।**
**सदा संचला येत ना जात काहीं।**
**तयावीण कोठें रिता ठाव नाही।।१९५।।**

**श्लोकार्थ :-**
हृदयामध्ये जो देव राहतो तो आकाशा प्रमाणे सर्व ठिकाणी व्यापून आहे. तो निरंतर सर्वत्र भरलेला असल्याने त्यांच्यावाचून कोणतीही जागा रिकामी नाही. अर्थात त्याला कोठे येणे नाही आणि जाणे नाही.

**विवेचन :-** सर्व ठिकाणी एकच परमात्मा अवघ जग व्यापून राहिलेला आहे. हे आपण याआधीही बघितले आहे. समुद्रातून खूप सारे पाणी बाहेर काढले आणि घरातील सर्व भांडी भरून ठेवली, तर समुद्रातील पाणी आणि भांड्यातील पाणी यामध्ये पाणी म्हणून काहीही फरक नाही. फरक इतकाच आहे की समुद्रात असलेल्या पाण्याला भांड्यासारखा विशिष्ट आकार नाही. समुद्र विशाल तर भांड्याच्या आकाराला मर्यादा आहे.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

वाहनाच्या चाकामधील हवा आणि वातावरणातील हवा यात हवा म्हणून काही फरक नाही, परंतु चाकामधील हवा काढली म्हणून वातावरणातील हवेचे आकारमान वाढत नाही किंवा आणखी चार चाकांमध्ये हवा भरली म्हणून हवेचे आकारमान कमी होत नाही. एक फरक मात्र आहे, चाकामधील हवा काढली किंवा गेली याचा अर्थ चाक निकामी झाले किंवा त्याला कुठेतरी छिद्र पडले आहे, असे समजावे लागते. आपण सुज्ञ वाचक आहात, त्यामुळे बाकीचे स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता नसावी.

समर्थ इथे परमात्म्याला आकाशाची उपमा देतात. प्रत्येक मडक्यात आकाश आहे आणि मडक्याच्या बाहेर सुद्धा आकाश आहे आणि मडके फुटले तरी आकाश आहेच. श्रीमद्भगवद्गीतेत सांगितल्या प्रमाणे आत्मा अविनाशी आहे, तो फक्त शरीरे बदलतो.

"सांडूनिया जर्जर जीर्ण वस्त्रे | मनुष्य घेतो दुसरी नवीन|| तशी चि टाकूनि जुनी शरीरे आत्मा ही घेतो दुसरी निराळी ||"* (गीताई २.२२)

परमात्मा नाही अशी जागाच या विश्वात नाही, असे सर्व संतांनी सांगितले आहे. विश्व व्यापून राहीलेला तो विश्वंभर, हे मनुष्याने कायम धान्यात ठेवावे. संत ज्ञानेश्वर माऊली म्हणतात तो विश्वात्मक देव हाच आणि समर्थांचा



आत्माराम हाच आणि एकच.
संत एकनाथ म्हणतात,
"मजवेगळा रिता कांहीं । अणुभरी ठाव उरला नाहीं । मी सर्वात्मा सर्व देहीं । सर्वगत पाहीं सर्वदा ॥" (नाथ भागवत १३.६९५)
{अर्थः- माझ्याशिवाय रिकामी अशी अणुभरसुद्धा जागा नाही. साऱ्या देहांमध्ये सदासर्वदा मी सर्वांतरात्मा व्यापून राहिलेला आहे. वासनेत देहाची निर्मिती आहे. मनातील वासना पूर्ण होण्यासाठी जीव आपल्या वासनांची पूर्तता जिथे होऊ शकेल अशा पूरक योनीत जन्म घेत असतो. वासनेचा क्षय झाला, अहंकार गळून पडला की त्याचे जन्म मरण संपते. चौऱ्यांशीचा (८४ लक्ष योनी) फेरा संपतो असेही म्हटले जाते. सोप्या शब्दात सांगायचे तर सद्गुरू श्रीगोंदवलेकर महाराज म्हणतात, त्याप्रमाणे ज्याचे हवेनकोपण संपले, तो मुक्त झाला. मनुष्याला मुक्ती अन्य कोणापासून मिळवायची गरज नाही, त्याला *'स्वतः' पासूनच मुक्त होण्याची गरज आहे.*
संत एकनाथ म्हणतात,
*"तेवीं देहाचें नश्वरपण । आत्मा अखंडत्वें परिपूर्ण । आत्म्यासी देहांतरगमन । जन्ममरण असेना ॥ २९ ॥ देहीचें देहांतरगमन । वासनायोगें करी मन । तें मनोगमनाचें लक्षण । ऐक संपूर्ण सांगेन ॥ ४३० ॥
(ना. भा. अध्याय २२)
||जय जय रघुवीर समर्थ||

## लोभी कंजूष व्यक्ती

आधुनिक केसरी

एका गावात दामोदर नावाचा माणूस राहत होता. तो फार लोभी होता. आपल्या संपत्तीचा कधी वापरच करत नव्हता. तो फार कंजूष होता. पैसे खर्च होऊ नये म्हणून नवे कपडे वापरत नसे, नव्या वस्तूही खरेदी करत नसे. त्याला सतत आपल्या पैशाची काळजी असायची. म्हणून त्याने पैसे एका गुप्त ठिकाणी लपवून ठेवायचे ठरवले आणि जंगलातील एका झाडाखाली त्याने मोठे खड्डे घेऊन त्यात पैसे आणि सोने पुरून ठेवले. काही दिवसांत तेथील खड्डे संपूर्ण भरले. मग त्याने दुसऱ्या जागी संपत्ती पुरून ठेवण्याचा विचार केला. असे त्याने कित्तेक झाडांखाली आपली संपत्ती पुरली. तो रोज त्या ठिकाणी येऊन जमीन खोदून संपत्ती तपासून पहायला आणि तेथून निघून जायचा. काही दिवसांत त्या गावात अचानक मुसळधार पाऊस सुरू झाला आणि पहाता पहाता संपूर्ण गावात पूर आला. जंगलातील झाडे देखील पडले. दामोदरला आपल्या संपत्तीची फार चिंता वाटू लागली. पूर शांत झाल्यावर त्याने पाहिले, तर त्याचे सारे पैसे, सोने, नाणे वाहून गेले होते. तो दुःखाने जोराने ओरडू लागला. त्याच्याजवळ आता काहीच उरले नव्हते. त्याची ही गोष्ट ऐकून त्याची बायको म्हणाली, " तुम्ही त्या संपत्तीचा कधी वापरच करत नव्हते, मग ती गेली म्हणून शोक तरी कशाला करायचा त्याचा काय उपयोग!"

**तात्पर्यः** प्रत्येक गोष्टीचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. लोभ नेहमीच दुःखाचे कारण बनते. **प्रा.भावना गांधिले.,अ.नगर**




महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार


महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई








मा.श्री.वसंत मुंडे


महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ








महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई

# जीएसटी वाढ

आधुनिक केसरी

वस्तू आणि सेवा करापोटी (जीएसटी) डिसेंबर २०२२ मधील महसूल संकलन १५ टक्क्यांनी वाढून १.४९ लाख कोटींवर पोहोचले. सुधारित उत्पादनाचे सुधारित प्रमाण आणि विनियोग मागणीतील वाढीचे हे निदर्शक आहे. तसेच हे या करविषयक नियमांचे चांगल्या अनुपालनाचेही निदर्शक आहे. या करसंकलनापोटी महसूल १.४० लाख कोटींवर राहण्याचा डिसेंबर हा सलग दहावा महिना आहे. नोव्हेंबरमधील कर संकलन सुमारे १.४६ लाख कोटी होते. अर्थ मंत्रालयाने या संदर्भात दिलेल्या निवेदनात नमूद केले, की डिसेंबर २०२२ मध्ये 'जीएसटी'चा एकूण महसूल १,४९,५०७ कोटी संकलित झाला. यात केंद्रीय 'जीएसटी' (सीजीएसटी) २६ हजार ७११ कोटी, राज्याचा 'जीएसटी' (एसजीएसटी) ३३ हजार ३५७ कोटी, एकात्मिक वस्तू आणि सेवा कर (आजीएसटी) ७८ हजार ४३४ कोटी (आयातीवर संकलित ४० हजार २६३ कोटींसह) आणि उपकरापोटी ११ हजार ५ कोटी (आयातीवर संकलित ८५० कोटींसह) एवढा महसूल संकलित झाला. डिसेंबर २०२२ चा महसूल मागील वर्षी याच महिन्यात झालेल्या 'जीएसटी' संकलनापेक्षा १५ टक्के जास्त आहे, मागील वर्षी हा महसूल १.३० लाख कोटींच्या आसपास होता. या महिन्यात आयातीतून मिळणारा महसूल आठ टक्क्यांनी अधिक होता आणि देशांतर्गत व्यवहारापोटीचा महसूल (सेवांच्या आयातीसह) हा गेल्या वर्षीच्या याच महिन्यात या स्रोतांमधून मिळालेल्या महसुलापेक्षा १८ टक्क्यांनी अधिक आहे. नोव्हेंबर २०२२ मध्ये ७.९ कोटी 'ई वे बिले' झाली. ऑक्टोबर २०२२ मध्ये जारी केलेल्या ७.६ कोटी 'ई-वे बिलां'च्या तुलनेत लक्षणीय होती. एप्रिलमध्ये 'जीएसटी'पोटी सुमारे १.६८ लाख कोटींचे विक्रमी महसूल संकलन झाले होते. मेमध्ये सुमारे १.४१ लाख कोटी, जून (१.४५ लाख कोटी), जुलै (१.४९ लाख कोटी), ऑगस्ट (१.४४ लाख कोटी), सप्टेंबर (१.४८ लाख कोटी), ऑक्टोबर (१.५२ लाख कोटी) ), नोव्हेंबर (१.४६ लाख कोटी) आणि डिसेंबर (१.४९ लाख कोटी) एवढे संकलन झाले आहे. नोव्हेंबरच्या तुलनेत राज्यातील वस्तू आणि सेवा कराच्या संकलनात सुमारे दोन हजार कोटींनी वाढ झाली आहे. राज्यात नोव्हेंबरमध्ये वस्तू आणि सेवा कराचे २१,६११ कोटी रुपये संकलन झाले होते. या तुलनेत डिसेंबरमध्ये २३,५९८ कोटी रुपयांचे संकलन झाले आहे. देशातील वस्तू आणि सेवा कराच्या संकलनात वाढ झाली. तोच कल महाराष्ट्रातही बघायला मिळाला. तिमाही परतावा आणि वर्षाअखेर होणारे व्यवहार यामुळे संकलनात वाढ झाल्याचे वित्त विभागाचे म्हणणे आहे. सणासुदीच्या काळात ऑक्टोबरमध्ये झालेल्या संकलनापेक्षा डिसेंबरमध्ये संकलनात वाढ झाली आहे.

# स्त्रियांनी सावित्रीबाई फुलेंचा आदर्श घ्यावा



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**महात्मा जोतिराव फुले यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांची ३ जानेवारीला जयंती आहे. त्यानिमित्ताने सावित्रीबाई फुलेंनी केलेल्या सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, संसारिक, वैचारिक, साहित्यिक व मानवतावादी आशा विविध कार्याचा प्रत्येक स्त्रीने अभ्यास आणि विचारमंथन करून आपल्या आणि इतरांच्या जीवनात आमूलाग्र बदल, परिवर्तन घडवून आणण्यासाठी मनोभावे कृतीशील प्रयत्न करणे आजच्या काळात गरजेचे आहे. स्वतः अनेक दुःखे पचवून, स्वतःचा जीव धोक्यात घालून समाजातील तळागाळातील माणसांना सुख मिळवून देण्याचा आणि माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी केला आहे.**

दया,प्रेम,परोपकार,मानवता, आपुलकी, सदाचरण,समता ही मूल्ये त्यांनी आपल्या आयुष्यात जपली. स्त्रियांची दुखे, शूद्रांची दुःखे, अज्ञानात बुडालेल्या समाजाची दुःखे, दलितांवरील अन्याय अत्याचाराची दुःखे, विधवांची दुःखे,केशवपनाची दुःखे त्यांनी अगदी जवळून पाहिली. या सा-या दुःखाचा नायनाट करण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य प्राणपणाला लावले.

अज्ञानाच्या अंधारातून, रूढी,परंपरा, अंधश्रद्धेच्या जोखडातून अस्पृश्य व रंजल्या गांजलेल्यांना बाहेर काढण्यासाठी, माणूसपणाचे जिने त्यांना मिळवून देण्यासाठी आपल्या पतीला म्हणजे महात्मा जोतिराव फुलेंना सावित्रीबाई फुलेंनी खांद्याला खांदा लावून साथ दिली. हरी नरके त्यांच्याविषयी म्हणतात की," महात्मा जोतीराव फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले हे देशाच्या सामाजिक आणि शैक्षणिक इतिहासातले एक आगळेवेगळे जोडपे होते." हे खरेच आहे. त्यांनी सामाजिक समता निर्माण करण्यासाठी इथल्या व्यवस्थेशी अगदी कडाडून विरोध केला. कडवी झुंज दिली. विधवा पुनर्विवाह घडवून आणून, अस्पृश्यांच्या मुलींसाठी शाळा काढून,बालहत्या प्रतिबंधक गृह काढून, अस्पृश्यांसाठी विहीर खुली करून, दुष्काळात अन्नछत्रे उघडून,सत्यशोधक समाजाची स्थापना करून, विधवांचे पुनर्विवाह घडवून आणून एक सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्रांती घडवून आणली. स्त्रियांनी विद्या शिकू नये, सुशिक्षित होऊ नये, धर्म जाणू नये, पुरुषांच्या बरोबरीने काम करू नये अशा अनेक गैरसमजुतींना सावित्रीबाई फुले यांनी महात्मा जोतिराव फुलेंच्या मदतीने ठोकर देऊन शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात एक क्रांती घडवून आणली. पुरोहिताला नाकारून अनेक विवाह सावित्रीबाई फुले यांनी घडवून आणले. ज्या शूद्र अतिशूद्रांचे जीवन धार्मिक परंपरेने, जाती व्यवस्थेने कंगाल केले होते( महात्मा फुले यांना लग्नाच्या वरातीतून हाकलून दिले होते.) त्या धार्मिक परंपरा नाकारून विधायक विद्रोह करून समाजाला योग्य मार्गदर्शन करण्याचे काम सावित्रीबाई फुले यांनी केले. महात्मा जोतिराव फुलेंनी स्वतः सावित्रीबाई फुलेंना शिक्षण देऊन शिक्षिका केले होते. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे महत्त्वाचे माध्यम आहे हे त्यांनी ओळखले होते. म्हणूनच सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शाळेत शिकवण्याचे काम केले. मुक्ता साळवेसारखी धर्म चिकित्सक विद्यार्थिनी घडवली. ती व्यवस्थेला, धर्माला प्रश्न विचारू लागली. त्यांच्या या कृत्यामुळे सनातनी वर्ग खवळत असे तरीही त्याला,त्याच्या छळाला न जुमानता सावित्रीबाई फुले यांनी आपले कार्य चालूच ठेवले. स्त्री शिकली म्हणजे ती समाजात चांगला बदल घडवून आणू शकते असा त्यांचा विश्वास होता. सावित्रीबाई फुले ह्या उत्तम कवयित्री होत्या.



'काव्यफुले' नावाचा त्यांचा कवितासंग्रह ही प्रसिद्ध आहे. त्या एका कवितेत म्हणतात की,
"शूद्रांना सांगण्याजोगा आहे शिक्षण मार्ग हा
शिक्षणाने मनुष्यत्व पशुत्व हाटते पहा"
अशा प्रकारे सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून जातिभेद निर्मूलन करणे, अस्पृश्यांचा उद्धार करणे, सनातनी धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील मक्तेदारी मोडून काढणे हे कार्य केले. यासाठी त्यांनी 'सत्यशोधक समाजा' च्या माध्यमातूनही हे कार्य केले. महात्मा जोतीराव फुले यांच्या निधनानंतर त्यांनी सत्यशोधक समाजाची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन समाजाची सेवा केली. आपल्या राहत्या घरामध्ये ब्राह्मण विधवांसाठी आश्रम सुरू केला.एका ब्राह्मण विधवेचा मुलगा (यशवंत) दत्तक घेऊन त्याला वैद्यकीय शिक्षण दिले आणि त्याचा आंतरजातिय विवाह करून दिला. सावित्रीबाई फुले या आयुष्यातील पन्नास वर्ष लोकांची सेवा करण्यासाठी राबत होत्या. अखेर प्लेग झालेल्या मुलाला स्वतःच्या पाठीवर घेऊन दवाखान्यात पोहोचल्या. त्या प्लेगची बाधा सावित्रीबाई फुले यांना झाली आणि 10 मार्च 1897 रोजी रात्री नऊ वाजता प्लेगमुळे त्यांचे निधन झाले. एवढे सांगण्याचे कारण म्हणजे आज सावित्रीबाई फुलेंच्या कार्यामुळे स्त्रियांनी नानाविध क्षेत्रात प्रचंड क्रांती केली. प्रगती केली.पुढे गेल्या. नोकरी व विविध पदे मिळवले परंतु सावित्रीबाई फुलेंनी जी क्रांती केली, जे काम केले, जो परिवर्तननाचा,वैज्ञानिकतेचा विचार पेरला त्यापासून मात्र आधुनिक स्त्री कोसो दूर आहे. आज शिकलेली स्त्री ही रूढी परंपरा,अंधश्रद्धा यामध्ये प्रचंड गुरफटून गेलेली दिसते आहे. शिक्षण घेऊनही प्रतिगामी विचारांची पेरणी आपल्या आचरणातून आणि शिक्षणातून पेरताना दिसते आहे.

सावित्रीबाईंच्या अलौकिक कार्याबद्दल कृतज्ञता दाखविणे हे भारतीय स्त्रियांचे कसे कर्तव्य आहे हे सांगताना धनंजय कीर म्हणतात की," हिंदी स्त्रीया सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यस्मृतीलाही जागत नाहीत.ज्या साध्वीने भारतातील तमोयुगात शिक्षिकेचा पेशा पत्करण्याचे अलौकिक धैर्य दाखवून हिंदी स्त्रीवर लादलेली अन्यायी बंधने झुगारून दिली; आणि मुलींना शिकवून हिंदी स्त्रियांच्या उध्दार साधण्यासाठी पतीबरोबर सास-याचे घर सोडले.पतीसंगे हाल अपेष्टा भोगल्या.शिव्याशाप सहन केले.त्या स्त्रीशिक्षणाच्या अग्रदूतीची हिंदी स्त्रियांनी स्मृती बाळगू नये,ही कृतघ्नपणाची परमावधीच नव्हे काय? एकोणिसाव्या शतकात स्त्रियांच्या उद्धारासाठी व्यतीत केलेलं सावित्रीबाईसारखे अन्य आदर्श उदात्त उदाहरण क्वचितच आढळून येईल." म्हणून खरेतर आजच्या स्त्रीने चिकित्सक बनून, वैज्ञानिक दृष्टिकोन मनी बाळगून शैक्षणिक,सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उर्जाशील आणि प्रेरणादायी कार्य करणे फार गरजेचेच नव्हे तर काळाची गरज निर्माण झाली आहे. आजचा काळ हा पुन्हा प्रतिगामी विचाराकडे वाटचाल करताना दिसतो आहे. त्यामुळे पुन्हा स्त्री बंधनात अडकता कामा नये.फुले दाम्पत्यांनी स्त्रीला अनेक बंधनातून बाहेर काढले आहे. त्या स्त्रीने सामाजिक सुधारणेपासून दूर जाता कामा नये. याची जाणीव ठेवून आजच्या स्त्रीने प्रतिगामी विचारांच्या विरुद्ध बंड उभारणे काळाची गरज आहे. जेणेकरून आजची पिढीही मानसिक दृष्ट्या सक्षम कशी बनेल यासाठीही प्रयत्न करणे काळाची गरज निर्माण झाली आहे.महात्मा जोतिराव फुलेंप्रमाणेच सावित्रीबाई फुले ह्या एक शिक्षिका, विचारवंत,समाजसुधारक,तत्त्वचिंतक, समाजचिंतक होत्या. तोच सावित्रीबाई फुलेंचा आदर्श आजच्या स्त्रियांनी आपल्या जीवनात अंगी बाळगायला हवा.एवढेच या निमित्तानं सांगावयाचे आहे.

**संदर्भ:**

**१) हरी नरके, महात्मा फुले:शोधाच्या नव्या वाटा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षि शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई ,पाचवी आवृत्ती २००६**
**२) डॉ. मा. गो.माळी, सावित्रीबाई फुले-समग्र आ**

# सकारात्मक जीवन जगा



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**1952 मध्ये एडमड हिलेरीने जगातल्या सर्वात उंच शिखर असलेल्या माऊंट एव्हरेस्टवर चढण्याचा प्रयत्न केला,पण त्याला यश मिळाले नाही. काही आठवड्यानंतर त्याला इंग्लडमधील एका कार्यक्रमात बोलायला लावलेइलेरी मंचावर आला आणि म्मूंट एव्हरेस्टच्या चित्राकडे पाहात मूठ आवळत म्हणाला, ' माऊंट एव्हरेस्ट , तू मला पहिल्या वेळेस हरवले आहेस. पण पुढच्या खेपेला मी तुला हरवून टाकीन. कारण तू आणखी उंच वाढू शकत नाहीस, मी मात्र प्रगती करू शकतो.'**

एका वर्षाने म्हणजे 29 मे रोजी एडमंड हिलेरी माऊंट एव्हरेस्टवर पाऊल ठेवणारा पहिला मानव ठरला. त्यावेळी हिलेरी म्हणाला होता,' माणसाला पर्वताला नव्हे तर स्वतः वर विजय मिळवावा लागतो.' 'दी सिक्रेट' ची लेखिका रॉण्डा बर्न आपल्या जीवनाविषयी सांगते," मी पूर्णपणे निराश झाले होते. शारीरेक, भावनात्मक आणि आर्थिकदृष्ट्या पुरती खचून गेले होते. त्यातच अचानक माझे वडील गेले. आता मला माझ्या आईचीही चिंता सतावू लागली. चारी बाजूने जसा दुःखाचा डोंगर कोसळला होता. मी रात्रं-दिवस रडत होते... रडत होते आणि फक्त रडत होते. पण अचानक माझ्या मनात आशेचा एक तरंग उमटला. आता मी चांगल्या गोष्टींना माझ्या जीवनाकडे खेचू लागले. चांगल्या गोष्टींची आशा करताच मी प्रसन्नता महसूस करू लागले. चमत्कार होऊ लागला. मी शारीरेक, मानसिकदृष्ट्या अत्यंत समाधानी राहू लागले. धनवान हो ऊ लागले आणि प्रसिद्ध पावू लागले. हीच 'दी सिक्रेट'ची सुरुवात होती माझ्यासाठी ! मी एक बेस्टसेलर पुस्तकाची लेखिका बनले होते. कारण , मला खात्री होती की, असे होणार !'

या नव्या वर्षात आपण सगळ्यांनी मिळून संकल्प करुयात की, नेहमी आशेचा पदर धरून चालू. मग पुढ्यात कितीही मोठी संकटे येऊ देत. निराश व्हायचं नाही. दुः खी व्हायचं नाही. आपण आशावादी राहिलं की नशीबसुद्धा आपल्या मागे मागे चालून येईल. 'युनिवर्सिटी ऑफ नॉर्थ कॅरोलिया ( युएस) मधील मानसशास्त्राचे प्रोफेसर बारबरा फ्रेड्रिक्सन यांनी आपल्या ताज्या संशोधनात सकारात्मक भावनेमुळे मोठमोठ्या संकटांवर मात करण्यासाठी ऊर्जा मिळते. उत्तम क्षमता प्राप्त होते.इतकेच नव्हे तर यामुळे एकाग्रता आणि शिकण्याच्या ऊर्मीत वाढ होते. फ्रेड्रिक्सन म्हणतात,' गेल्या काही वर्षांपासून आम्ही पॉझिटिव्ह विचार आणि प्रसन्नतेच्या संबंधातले काही रंजक तथ्ये अभ्यासली आहेत. सकारत्मक विचाराने जीवनात महत्त्वपूर्ण यशात्मक बदल घडवता येतात. याचा शोध लागला आहे."

रॉन्डा बर्न म्हणतात," तुम्ही या ब्रम्हांडातले सर्वात शक्तीशाली चुंबक आहात. जसा विचार कराल, तसेच घडेल. चांगल्याची आशा करा... चांगल्या गोष्टीची खात्री बाळगा... सगळे काही चांगलेच होईल. तुम्ही आशावादी राहिलात आणि एखाद्या पॉझिटिव्ह गोष्टी व विचारांवर फोकस करता आहात. तर त्याक्षणी तुम्ही ब्रम्हांडातल्या सकारात्मक वस्तूंना आपल्याकडे खेचत असता." "आशावादी माणसे आजारी पडल्यावरही रुटीन जीवनाशी जोडलेली असतात. आपल्याला कुठला आजार आहे आणि तुम्ही रात्रंदिवस यावरच विचार करता आहात , तुमच्या भेटीला येणाऱ्या लोकांशीही याच विषयांवर



बोलता आहात तर मग खात्रीने समजा की, तुम्ही आजाराच्या अधिक कोषिका निर्माण करता आहात. दिवसभर स्वतःलाच शंभरदा म्हणा, मी सुखी, समाधानी आहे. फिट आहे. मला मस्त वाटते आहे. असे म्हणून स्वतःला ऊर्जा द्या. आणि सामान्य जीवनाशी एकरुप व्हा." रॉन्डा बर्न आपल्याला जर सुखी आणि आनंदी जीवन जगायचे असेल तर सकारात्मक विचार करा. याचे फायदे अनेक आहेत. या सृष्टीत दोन प्रकारच्या उर्जा सतत निर्माण होत असतात. चांगल्या आणि वाईट, सुखी आणि दुःखी, सकारात्मक आणि नकारात्मक, सुगंधी आणि दुर्गंधी, योग्य आणि अयोग्य पण यातून आपण कुठल्या आकर्षित करायच्या ते आपल्याच हातात आहे. यात महत्त्वाचे भूमिका बजावते ते आपले मन. मनच सर्वांचा कर्ता करविता आहे. हे मनच आत्म्याचे एक रुप आहे. आत्मा दिसत नाही, मन दिसत नाही पण त्याला अखिल ब्रह्मांडाची जाणीव आहे. ते क्षणार्धात करोडो मैलांचा पल्ला पार करु शकते. अक्षरशः ईश्वराला समोर उभे करु शकते. म्हणजेच मनाद्वारे आपण शरीरावर नियंत्रण, सभोवतालच्या परिस्थितीवर नियंत्रण आणू शकतो. बघा मन प्रसन्न असेल तर आजूबाजूचा परिसर, सजीव, निर्जीव सर्व गोष्टी प्रसन्न वाटू लागतात.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

# महाराष्ट्र विधानसभेतील कंधारची तोफ थंडावली !

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राच्या विधानमतदार संघातील विरोधी पक्ष नेते व कंधारची तोफ म्हणजे शे.का.पक्षाचे ज्येष्ठ नेते केशवराव धोंडगे यांचा उल्लेख केला जात असे. ती तोफ नवीन वर्षाच्या २०२३ च्या पहिल्या दिवशी शांत झाली आहे.धोंडगे हे गेले काही आजारी होते, त्यांचेवर औरंगाबाद येथे उपचार चालू होते. मृत्यूसमयी त्यांचे वय १०२ वर्षाचे होते.त्यांचा १४ जुलै१९२२ रोजी झाला होता. ते सहा वेळा आमदार व एक वेळ खासदार होते. राज्य विधानसभेच्यावतीने ऑगस्ट २०२२ ला शतकपूर्ती सोहळ्या- निमित्त गौरव व सत्कार करण्यात आला होता. महाराष्ट्रातील त्यांच्या वादळी राजकीय कारकिर्दीचा परिचय.**

स्वातंत्र्यानंतर पहिली विधानसभा निवडणूक १९५१ मध्ये झाली. तेंव्हा नांदेडचा भाग हैद्राबाद राज्यात होता.कंधार विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे दोन आमदार गोविंदराव मोरे, माधवराव स्वामी हे दोघे निवडून आले तर पद्मश्री शामरावजी कदम यांनी शे.का.पक्षातर्फे निवडणूक लढवली होती,त्यात त्यांचा पराभव झाला.त्यानंतर या मतदार काँग्रेसला सतत पराभव होत गेला. कंधारचा पराभव राज्य व जिल्ह्याच्या नेत्यांच्या जिव्हारी लागत होता.बॉंम्बे प्रांतच्या १९५७ च्या निवडणुकीत केशवराव धोंडगे हे लाल बावटा घेऊन प्रथम राजकारणात उतरले.तेंव्हा शे.का. पक्षातर्फे धोंडगे व काँग्रेसचे आनंदराव टेळकीकर यांच्यात पहिली लढत झाली.काँग्रेसचे चिन्ह बैलजोडी तर शेका पक्षाचे चिन्ह खटारा( बैल नसलेली गाडी ) हे चिन्ह होते.यावेळी निवडणुकीत काँग्रेसला विजय मिळेल,असा नेत्यांना आत्मविश्वास होता.कारण तेंव्हा देशात व राज्यात काँग्रेसपक्षाबद्दल सहानुभूतीची मोठी लाट होती.पण त्यावेळी मनार खोऱ्यातील मतदारांनी धोंडगे यांना साथ दिली व ते प्रथम विधानसभेवर गेले.महाराष्ट्र सीमा प्रश्नासबंधात शे,का.पक्षातर्फे धोंडगे यांनी सत्याग्रह आंदोलने नेतृत्व केले.त्यांनी १९५८ भालकीला दीड महिन्याचा कारावास भोगला.धोंडगे आपल्या भाषणाची सुरूवात 'मर्द हो' या शब्दाने करत असत. त्यानंतर महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर १९६२ राज्य विधासभेची निवडणूक झाली.महाराष्ट्राचे नेतृत्व स्व. यशवंतराव चव्हाण यांचेकडे होते.त्यामुळे यशवंतराव चव्हाण,नांदेड जिल्ह्याचे नेते शंकरराव चव्हाण यांनी कंधारची निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. धोंडगे यांना पराभूत करण्यासाठी पक्षाने काँग्रेस मतदार संघाबाहेरील उमेदवार साहेबराव बारडकर यांना तेथे उभे केले.पण १९६२आणि १९६७ च्या दोनवेळेसच्या निवडणुकीत धोंडगे यांच्या समोर बारडकर यांचा पराभव झाला.काँग्रेस नेत्यांनी धोंडगे यांना पराभव करण्यासाठी जंग -जंग पछाडले.खुद राज्याचे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते स्व. यशवंतराव चव्हाण प्रचारसाठी कंधारला हेलीलिकॉप्टरने आले होते.स्व. तर शंकरराव चव्हाण यांनी प्रचार सभेत "कंधार डाग" पुसून काढला असे वक्तव्य केले.त्यामुळे खळबळ उडाली. होती. या वक्तव्यावरून धोंडगे यांनी काँग्रेस नेत्यांचा खरपूस समाचार घेतला होता.त्यांनी तो डाग कोणतो? या शब्दावरून काँग्रेस नेत्यांची खिल्ली उडविली. धोंडगे व काँग्रेस नेत्यांत आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडत असत.धोंडगेभाषता काय बोलतात हे ऐकण्यासाठी सभेला गर्दी व्हायची.त्यांच्या शब्दाला धार होती. ते तधून मधून कोपरखळ्या मारत असत! भाषणात जोश असायचा! मर्द हो! असे म्हणत,ते मांडी थोपटत असत.त्यांच्या कंधारच्या शिवाजी चौकातील सभा गाजल्या आहेत. विरोधी पक्षाच्या नेत्यावर टीका करताना ते कधीच कचरत नसत.त्यामुळे पण जिल्ह्यातील काँग्रेस नेते मात्र सावधपणे बोलावयाचे! १९७२ च्या विधानसभा निवडणुकीत धोंडगे यांनी माधवराव जाधव यांचा पराभव केला.त्यानंतर निवडणुकीत धोंडगे हे वाढत्या मताधिक्याने विजयी होत गेले.धोंडगे यांचा पराभव करणे अशक्य आहे,असे काँग्रेस नेत्यांना मत बनले! कंधार विधानसभाबाबत राज्य नेतृत्वाने तर हात टेकले!देशात आणीबाणीनंतर लोकसभेची निवडणूक झाली.नांदेड लोकसभा मतदार संघातून१९७८ मध्ये सर्व विरोधी पक्षांनी एकच उमेदवार देण्याचा निर्णय घेण्यात आला.धोंडगे यांच्या विरोधात काँग्रेसने गो.रा.म्हैसेकर यांना उमेदवारी होती. यातही त्यांनी म्हैसेकरांचा पराभव केला.ते प्रथम लोकसभेवर निवडून गेले.त्यानंतर पुन्हा १९८० ची लोकसभा निवडणुक महाराष्ट्रात लक्ष वेधणारी ठरली होती.राज्यातील दोन बलाढ्य नेते काँग्रेस नेते शंकरराव चव्हाण तर शे.का पक्षाचे ज्येष्ठ नेते धोंडगे



अशी लढत होती.पण यावेळेस धोंडगे मात्र पराभूत झाले.तिकडे कंधार विधान सभा मतदार संघात १९७८ मध्ये धोंडगे यांचे सहकारी भाई गुरूनाथ कुरूडे यांना पक्षाने उमेदवारी दिली. काँग्रेस पक्षातर्फे ईश्वरराव भोसीकर हे विरोधात उभे राहिले.पण यात कुरूडे हे विजयी झाले.पण१९८० च्या मध्ये ईश्वरराव भोसीकर हे निवडून आले.१९८५ पुन्हा धोंडगे स्वतःच्या मतदार उभे राहिले निवडून आले.राज्यात१९९० मध्ये राजकारण बदलत होते शिवसेनेत तरूण वर्ग होता. १९९० विधानसभा निवडणुकीत धोंडगे यांचा सामना शिवसेना उमेदवार रोहिदास चव्हाण यांच्याशी झाला.तरी त्यात धोंडगे विजयी झाले.पण १९९५च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे नवखे उमेदवार रोहिदास चव्हाण यांनी धोंडगे यांचा पराभव केला.चव्हाण यांना ४८ हजार तर धोंडगे यांना ३१ हजार मते मिळाली. शे.का पक्षाला राज्यात मोठा धक्का बसला.राज्यात प्रथम भाजपा व सेनेनी युती झाली.मतदारांनी काँग्रेसचा विरोधी पक्ष म्हणून शिवसेनेला संधी दिली शे.का. पक्षाचे राजकीय अस्तित्व धोक्यात आले.त्यात १९९९ च्या विधानसभेत शे.का.पक्षाची अस्तित्वाची व धोंडगे यांची ही शेवटी निवडणूक ठरली.धोंडगे यांना मतदारांनी चौथ्या क्रमांकाची मते दिली. शे.का. पक्षाचे राजकीय पर्व येथेच संपले.धोंडगेंनी समाजातील अपेक्षित समाजाचे प्रश्न सतत मांडले.वडार समाजाकरिता एक वसाहत उभारली होती.कंधार - लोहा किरोडा रस्त्यावर गुराखी गड उभारला आहे.तेथे गुराखी संमेलन घेतले जात असे.

राज्यात वादळी व्यक्तीमत्व, तत्वाला जागणारा नेता धोंडगे बाजूला फेकला गेला. त्यांचे राजकीय सामाजिक,शैक्षणिक क्षेत्रात काम केले कार्य केले हा इतिहास विसरू शकत नाही.ते ३५ वर्षे विरोधी पक्षाचा आमदार होते.त्यांची भाषणे ऐकण्याची व आंदोलने मी जवळून पाहिता आली.धोंडगे आपल्या भाषणांनी विधानसभागृह दणाणून सोडत असत. ते सामान्य माणसाचे प्रश्न उपस्थित करून सरकारला अडचणीत आणत आणत असत!.त्यांना सरकारमधील मंत्री घाबरायचे! इतके प्रभावी विरोधी पक्षाचे आमदार होते.त्यांना कंधारची मुलूख मैदानी तोफ असे म्हंटले जात असे.मानार खोऱ्याचा हा वाघ विधानसभेत जेंव्हा डरकाळी फोडायचा तेंव्हा राज्य सरकारही घाबरायचे!त्यांची टीका काटेरी असायची पण त्याला विनोदी झालर असावयाची,तेंव्हा अख्खे सभागृह हस्यात डुबायचे!मतदार संघातील प्रश्न व अन्याय भ्रष्टाचार व सरकारच्या विरोधात अभूतपूर्व मोर्चे निघायचे.त्यांनी कोण्याही मतासाठी कोण्या धर्माचे लांगूलचालन कधीच केले नाही. कंधारच्या दर्गामध्ये महादेवाची पिंडी होत्या.त्यावरून हिंदू -मुस्लिम असा वाद निर्माण झाला होता. तेंव्हा धोंडगे यांनी पुढाकार घेऊन त्या पिंडी बाहेर काढल्या.त्यामुळे हिंदू समाज त्यांचेवर नाराज झाला.त्यानंतर बहाद्दपूरा रस्त्याचे काम करताना कबरी खोदल्या जात आहेत.या आरोपावरून मुस्लिम समाजाने विरोध केला. तेव्हा त्यांनी 'क्या खाँ जहाँ की वहाँ" अशा शब्दात लिखाण केले. इतकेच नव्हे, त्यांनी शंभूकाचा खूनी राम व त्याची वानरशाही' हे पुस्तक लिहिले. समर्थ रामदास महाराज विवाहातून पळून गेल्यानंतर त्यांच्या पत्नीचे काय झाले?अशी लेखमाला प्रसिध्द केली.तेंव्हा आचार्य अत्रे व धोंडगे यांच्यातील वृत्तपत्रातून येणारी शब्दीक चकमक राज्यात गाजली. त्यांचे मोर्चे हलकीच्या आवाजात लाखोच्या संख्येने निघत असत त्यात पुरूषांबरोबर महिलांची संख्या तितकीच असायची. मोर्चातील अटक करतांना पोलिसांना गाड्या कमी पडायच्या.मोर्च्यांची नावे तर अभिनव होती ते म्हणजे बोंबल्या मोर्चा, घेराव मोर्चा,अशी नावे असावयाची. कंधार तहसीलदाराने पीठाच्या गिरणीसाठी पाशामियाँ यांना लाच मागितली,ही तक्रार धोंडगे यांच्यापर्यंत गेली.त्यांनी भगवानसिंह लाला ठाकूर (ते नाटकात स्त्री कालाकरांचे काम करायचे) त्यांना महिलेची वेशभूषा करण्यास सांगितले व त्या महिलेच्या डोक्यावर टोपलीत नोटा, जीवंत कोंबडी,नवसागर असे ठेऊन वाजत गाजत 'नजराणा" मोर्चा काढला. हा नजराणा तहसीलदारांच्या टेबलावर ठेवण्यात आला. तेंव्हा जिल्हा प्रशासनाने तहसीलदारांची चोवीत तासात बदली करावी लागली. त्यानंतर कापूस केंद्रावर काम करणाऱ्या महिलेला ग्रेडरने घरी बोलावले होते.महिलेने ही बाब धोंडगे यांच्या कानावर टाकली.धोंडगे यांनी एका गाढवीनला स्त्रीचे कपडे घालून ग्रेडरची 'गदर्भराणीशी सुहागरात्र'हा मोर्चा काढला. होता.शेवटी शासनाने ग्रेडरला निर्बलित केले व तेथून हाकलले.देशात आणीबाणीला विरोध राज्यात अधिक कोठे झाला असेल तर कंधार तालुक्यात. धोंडगेंनी आणीबाणीच्या विरोधातघोषणा देत घोषणा काढला.तेंव्हा पोलिसांनी मोर्च्यातील लोकांवर गुन्हा दाखल केला,त्यांना न्यायालयात नेले गेले.मोर्चातील लोकांची नाव देतांना एका पहिले गुराख्याचे देण्यात आले होते.जेंव्हा न्यायालयात पहिले नाव गुराख्याचे नाव पुकारले गेले,न्यायधीशांनीत्यास आणीबाणीच्या विरोधात घोषणा दिल्या का?असे विचारले, तेंव्हा तो गुराखी हूँ ..हूँ.... करू लागला, तो 'मुका' असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले गेले. त्यामुळेच न्यायालयाने सर्व मोर्चातील सर्वांना सोडून दिले. आणीबाणीच्या विरोधात दगडावर व म्हशींच्या पाठीवर घोषणा लिहिल्या गेल्या.आता पोलिस ते जप्त कसे करणार? राज्य राखीव दलाचे पोलिस पहारा करत असताना त्यांना करमणुकीच्या कार्यक्रमात गुंतवून त्याच्या डोक्यावर आणीबाणी विरोधात पुतळा लटकविला गेला. पण त्यांनी कधी हिंसाचा मार्ग कधी स्वीकारला नाही. कंधार जयक्रांतीचे संपादक होते,यात नांदेडच्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याच्या भ्रष्टाचाराच्या विरोधात वृत्त दिले होते.या पोलिस अधिकाऱ्याने धोंडगे यांच्या विरोधात मानहानीचा खटला दाखल केला.तो खटला नांदेडच्या कोर्टात चालला. लोकांची खटला ऐकण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती. शेवटी न्यायालयाने त्यांना कार्ट उठेपर्यंत शिक्षा सुनावली.नांदेडच्या काँग्रेस नेत्याचे विश्राम- गृहातील प्रकरणाच्या वृत्ताने खळबळ उडवून दिली होती.तेंव्हा जय क्रांती सप्ताहिक वाचण्यासाठी लोकांच्या उड्या पडत असत.त्यांनी राजकारणात येताच त्यांनी शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली. ग्रामीण मुलांना महिविद्यालयीन शिक्षण मिळावे,यासाठी त्यांनी आधी महाविद्यालयाला मान्यता नंतरच विवाह अशी प्रतिज्ञा त्यांनी केली होती. तेंव्हा शासनाने शिवाजी महाविद्यालयाला मान्यता दिली गेली. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात राष्ट्रवादी काँग्रेस नेते शरद पवार यांना डी.लिट.पदवी देण्यात आली.त्यावेळी त्यांनी पवारांविषयी कौतूक करताना बारामती,करामती भानामती बिनचिपळ्याचा नारद शब्द वापरले.पण ती त्यांची भाषणशैलीची अशी होती मराठवाड्यात त्यांच्या अनेक शिक्षण संस्था आहेत.पण ते ३४ वर्षे आमदार राहूनही मग कंधार तालुक्याचा विकास झाला नाही? या प्रश्नाचे उत्तर काय? तर विरोधी पक्षाचा मतदार संघ म्हणून काँग्रेस सरकारने विकास कामाकडे केलेले दुर्लक्ष हेच आहे. धोंडगे यांना अष्टपैलू व्यक्तीमत्व म्हणूनच महाराष्ट्र ओळखतो. त्यांना काँग्रेस पक्षात घेण्यासाठी नेत्यांनी बरच प्रयत्न केले. त्यांना राज्याचे मंत्री व अनेक मोठे पदे मिळाली असती,पण ते त्या अमिषाला कधी बळी पडले नाहीत.माझा शेवट 'लाल बावट्यात' होईल असे सांगून त्यांनी विरोधकांची तोंडे कायमची बंद केली.पक्षाचे ज्येष्ठ नेते धोंडगे यांचे वारसदार पूत्र लाल बावटा झेंडा खांद्यावर घेतील असे वाटत होते.या मतदार संघात त्यांचे पूत्र असो की इतर पक्षाचे नेते हे सत्तेसाठी पक्ष बदलेले आहेत.शे.का ने ज्येष्ठ नेते धोंडगे यांना विश्वासात न घेता पक्षाचा इतिहास माहित नाही, कधी चळवळीत सहभाग नाही, अश्या धनदांडग्याला अचानकपणे उमेदवारी दिली,हे पाहण्याची दुर्देवी वेळ त्यांचेवर आली.पण काही असो !कंधारच्या मनार खोऱ्यातील वाघ म्हणजे, केशवराजी धोंडगेच होते! असा महाराष्ट्राच्या राजकारणात विशेष विरोधीपक्षात राहून काम करणारा! निष्ठावंत,अभ्यासू ,प्रभावी वक्तृत्व,अपेक्षितांचा आवाज असलेला नेता आता होणे नाही. त्यांना माझी मानाची जयक्रांती.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या सावित्रीबाई फुले

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची आज म्हणजे ३ जानेवारी २०२३ रोजी १९२ वि जयंती. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी सातार्‍याजवळील नायगाव या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचे नाव खंडूजी नेवसे असे होते. त्यांचे वडील गावचे पाटील होते. ज्या काळात स्त्रियांना घराच्या बाहेर पडायचे बंधन होते, त्याकाळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. असे असले तरी सावित्रीबाई मात्र निडर स्वभावाच्या होत्या. त्या लहान असतांना एका दुबळ्या मुलाचे फुले पळवणाऱ्या धटिंगणाला त्यांनी अद्दल घडवली होती तसेच त्यांच्या घरासमोरील झाडावर असणाऱ्या घरट्यातील पक्षांची अंडी खाणाऱ्या नागाला त्यांनी ठेचून मारले होते.**

वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह महात्मा जोतीराव फुले यांच्याशी झाला. जोतीराव तेंव्हा तेरा वर्षाचे होते. त्याकाळी बालविवाहाची परंपरा होती, अगदी पाळण्यात देखील विवाह लावले जायचे. महात्मा जोतीराव फुले म्हणजे महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक. जोतीरावांना मातृप्रेम लाभले नाही. त्यांच्या मावस भगिनी सगुणा यांनी त्यांचा सांभाळ केला. सगुणा इंग्रज अधिकाऱ्याकडे दाई म्हणून काम करायच्या त्यामुळे त्यांना इंग्रजी कळायचे. आपल्या जोतीरावने देखील इंग्रजी फाडफाड बोलले पाहिजे असे त्यांना वाटायचे. त्यांनी जोतीरावांना शिकण्यास प्रेरित केले. जोतीरावही शिकले नंतर जोतिरावांनी सावित्रीबाई यांनाही शिकवले. मुलींच्या शिक्षणाचे महत्व जाणून मुलींसाठी शाळा काढण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ते नेहमी म्हणत एक मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते म्हणून १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. या शाळेत सावित्रीबाई फुले मुख्याध्यापक म्हणून काम पाहू लागल्या. या शाळेत सुरवातीला दोन मुली होत्या वर्षअखेर या शाळेतील मुलींची संख्या ४० ते ४५ पर्यंत पोहचली. या शाळेमुळे शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्री वर्गास ज्ञानाची कवाडे खुली झाली. पण हे चांगले काम त्याकाळातील सनातनी वर्गास रुचले नाही. मुली शाळेसाठी घराबाहेर पडू लागल्याने धर्म बुडाला अशी आरोळी ठोकत या सनातनी लोकांनी सावित्रीबाई व जोतीरावांच्या या महान कार्यास विरोध केला. सावित्रीबाई फुले यांच्या अंगावर शेण गोळे फेकले. काहींनी तर अंगावर हात टाकण्याचाही प्रयत्न केला पण फुले दांपत्य डगमगले नाही. घेतलेला वसा त्यांनी सोडला नाही. कितीही विरोध झाला तरी ध्येयापासून ते विचलित झाले नाही. जिद्दी व ध्येयवादी फुले दांपत्यांनी ज्ञानदानाचे आपले पवित्र कार्य चालूच ठेवले. जोतिरावांनी काढलेल्या शाळेत फुले दांपत्य व अन्य शिक्षक जीव ओतून शिकवत. विद्यार्थ्यांशी ते एकरूप होत त्यामुळे त्यांच्या शाळेची प्रगती लक्षणीय होती. त्यांच्या शाळेविषयी पुणे ऑब्जर्व्हर



या दैनिकामध्ये २१ मे १८५२ मध्ये लिहिले होते, जोतीराव फुलेंच्या शाळेतील मुलींची संख्या सरकारी शाळेतील मुलांच्या संख्येपेक्षा दहा पटीने जास्त आहे कारण या शाळेत मुलींना शिकवण्याची जी व्यवस्था आहे ती मुलांच्या शासकीय शाळेपेक्षा चांगली आहे. १८६३ मध्ये फुले दांपत्यांनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीबाई त्याच्या प्रमुख होत्या. १८८५ पर्यंत ३५ विधवा ब्राह्मण स्त्रिया त्यांच्याकडे आल्या. त्यांची बाळंतपणे सावित्रीबाईंनी केली. १८७४ साली काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवा त्यांच्या घरात आल्या. या काशीबाईच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले त्या मुलाचे नाव यशवंत ठेवले. यशवंतला शिकवून त्यांनी डॉक्टर बनवले. सण १८७७ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. या दुष्काळात फुले दांपत्यांनी लोकांना खूप मदत केली. त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी जेवणाखाण्याची सोय केली. सावित्रीबाईंनी केशवपन पद्धत बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करुन नाभिकांचा संप घडवून आणला. पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी समर्थपणे वाहिली. सावित्रीबाई फुले या मोठ्या साहित्यिकही होत्या. काव्यफुले व बावनकशी सुबोध रत्नाकर हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. १८९६-९७ साली पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला होता. प्लेग या जीवघेण्या आजाराने अनेकांचा जीव घेतला. हा रोग संसर्गजन्य आहे हे माहीत असूनही सावित्रीबाईंनी प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांची सेवा करु लागल्या. त्यांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेगची लागण झाली त्यातून १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले. सावित्रीबाई फुले यांचे कार्य समस्त मानवजातीला भूषणावह आहे म्हणूनच जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!



लक्ष्मण वाल्डे
संपर्क क्र. 8888606060

# बाल भिकारी

आधुनिक केसरी

**देशाच भविष्य असणाऱ्या बालगोपालांच्या हाती पाटी पुस्तक देण्याऐवजी भिकेच कटोर देणं म्हणजे पापाचे भागीदार होण्यागत आहे.कामचूकारपणाच्या आहारी जाऊन व्यसनांची भूक वाढवणे.आणि त्या भुकेवर मात करण्यासाठी भिकेचा मार्ग अवलंबन म्हणजे संस्कार दोष विघ्न पत्कारण आणि या दोषाला नजर अंदाज करण म्हणजेच प्राण घात करण. भिक्षा प्रतिबंध कायदा जो महाराष्ट्रात सर्वप्रथम लागू केला गेला. कारण महाराष्ट्रात भिकाऱ्यांची संख्या लाखांच्या घरात आहे. भिकाऱ्यांच्या पुनर्वसनासाठी महाराष्ट्रात चौदा भिक्षेकरी गृह आहे.**

त्या गृहाची क्षमता साडेचार हजार व्यक्तींची आहे. तिथे काम करणाऱ्याना दरमहा मानधनही दिल्या जात.आणि शासनाने या भिकाऱ्यांची उदरनिर्वाहाची जिम्मेदारीही घेतलेली आहे.त्यांची पुनर्वसन करण्याची ही मोहीम शासनाने राबवलेली आहे. बाल भिक्षेकांच पुनर्वसन करण्यासाठी शासनाने जिल्हात स्वतंत्र बालकल्याण समितीही स्थापन केलेली आहे.पण ह्या सगळ्या बाबीची सलगता राज्यकर्त्यांच्या दुर्लक्षितपणामुळे विकलांग झालेला आज बघायला मिळतो आहे.असा हा संदर्भ १६ सप्टेंबर २०१७ चा लोकमत आपल्याला देतो. आजपर्यंत बालमजूर हा प्रश्न सोडवता-सोडवता डोक्याचा भुगा होण्याची वेळ आली आहे.यासाठी काही कायद्याच्या तरतुदी ही करण्यात आल्या आहे. तरीही या प्रश्नाने डोक्याचे स्क्रू ढिले केले आहे.या समस्येची गंभीरता एवढ्या खोलवर जाऊन गुंतली आहे की या समस्या कायमच्या सुटायला तयार नाही.बाल मजुरी, बाल भिकारी यांचे पुनर्वसनाचे सक्त कायदे असूनही, ते कायदे आज नजराआड गेलेले दिसत आहे.आणि जे दिसतय त्याकडे दुर्लक्ष होतांना दिसतंय आणि त्या संधीचा फायदा घेऊन बाल मजुरीच्या पाठीला पाठ लावून "बाल भिकारी"ही समस्या तांडव करतांना,उद्धभवतांना दिसत आहे.बाल मजुरीला आळा घालता-घालता,संयमांची सिमा तुटली.राजकीय हलगर्जीपणामुळे बाल भिकारी ही समस्या मोठ्या संख्येने जन्माला येतांना दिसत आहे.या भिकाऱ्यांची जनगणना सर्वे करायचा ठरला तर यांची वर्गवारी पक्कयाने हजारांच्या पटीत लाखात सापडेल. बस स्टँड,रेल्वे स्टेशन, सिग्नल,चौफुल्या,नाके, सार्वजनिक ठिकाणे, शासकीय, निमशासकीय,बाजार मार्केट,अशा गल्लोगल्ली विविध ठिकाणी,बाल भिकारी भिक मागतांना दिसून येतात.त्यांना असं पाहून जणू पाहणाऱ्याच्या हृदयाला चटका बसावा तसं भासतं.त्या इवल्याशा जीवाच्या बालकांकडे पाहून जीव रक्ताळतो आणि त्यांचा असा अवतार त्यांच्या माय बापाला ओढत आणून दाखववावा अस मनात खदबदत.पण एक मन म्हणते.हे काय त्यांना माहित नसेल का...शंभर टक्के माहिती असणार त्यांना हे सगळं...कदाचित तेच त्यांना भिक मागायला मजबूर करत असणार ...त्यांची यात घालमेल असल्या शिवाय हे सगळं करणं शक्य नाही.कायद्याने या लोकांना शिक्षित करुण यांच्या हाताला काम देऊन यांचं पुनर्वसन करण्याची जिम्मेदारी सरकार घेत.पण आता हे सगळं होतांना पाहणं म्हणजे डोळे असून आंधळे होण्याच सोंग घेण.बालभिकारी विषय फालतू टाईमपास म्हणून त्याकडे काना डोळा होतांना दिसत आहे.एखाद्या हिंस्त्र प्राण्यांच्या तोंडाला रक्त लागाव.तस या बारक्या पोरांच्या हाताला पैसा लागला आहे.आणि त्याच पैशाने जणू त्यांची मती मारल्याचे दिसत आहे. सरकारने थोडं कायदा बेदखल ठेवला म्हणून याचा फायदा घेऊन ह्या भिकाऱ्यांनी बेधडक वाटणाऱ्या या धंद्यात बिनधास्त जगायच ठरवून घेतलं अशाच एका बारक्याने झाका-झाकात समाजाच्या तोंडावर उत्तर मारुन फेकले एकदा...

एके दिवशी एक लहान वयाचा साधारण सहा-सात वर्षांचा मुलगा सकाळी-सकाळी नाक्यावर एका चहाच्या हॉटेलवर भेटला.पैसे मागत होता. त्याला म्हटलं चहा घेतोस का रे...तो म्हणाला, नाही. मला पैसे पाहिजे.त्याला विचारलं,का..रे..काय करतो पैशाचं.तो म्हणाला मला बिस्कीट खायचे आहे.त्याला विचारलं का रे बाबा तू जेवतोस का...तो म्हणाला नाही.मग शाळेत जातो का.. तो म्हणाला नाही. त्याला विचारलं तुला पाटी दप्तर कपडे घेऊन दिले तर शाळेत जाशील का...तो म्हणाला,नाही...मी असं शाळेत-बिळेत जात-येत नाही.त्याच्या या उत्तरावर तिथल्या त्या हॉटेल मालकाने त्याला सहज गंमत म्हणून विचारलं.अस भिक मागोस्तर माझ्याकडे हॉटेलवर कामाला ये...तुला कपडे करतो.रोजी दोन वेळेला जेवण देतो.दिवस भरात चहा प्यायला घालतो.आणि वरतून रोज संध्याकाळी दोनशे रुपये देतो.फक्त मला मदत म्हणून ग्लास धुवून ठेवायचे आणि हॉटेलच्या-हॉटेलमध्ये ग्राहकाला चहा द्यायचा.सांग करतोस का...तयार असला तर लगेच आता पासून लाग कामाला.त्या वेळेस त्या एवढ्याश्या शेंमड्या पोराचं उद्धट उत्तर ऐकून,हॉटेल मधे बसलेल्या आणि हॉटेलच्या आजूबाजूला नाक्यावर असलेल्या माणसांनी त्याच ते उत्तर ऐकून प्रत्येकाच्या मनातून क्रोध अग्नी भडकावा तसा प्रसंग घडून आला.पण लहान मुलगा आहे.म्हणून मजाक मधे घेऊन त्याच बोलण ऐकून तोंडात बोट घातली. अगदी भारावून गेले होते सगळे जण.जणू त्याच्या त्या उत्तराने तिथल्या सगळ्या ऐकणाऱ्या शहाण्या-सुरत्या लोकांच्या तोंडात प्रेमाने,चार–चौघात पायतलं पायदान फुलात घालून गोड बोलून माराव तसे ते उत्तर होते.ते उत्तर होते.

"मला तुम्ही दोन हजार रुपये जरी रोज दिला तरी मी तुमचे उस्टे ग्लास धुवूणार नाही. तुम्हीच माझ्या सोबत चला मी तुम्हांला दोनश्याचे चारशे रुपये रोज देतो".अशा या त्यांच्या उत्तराने सगळ्यांच्या थोबाडीत मारल्यागत झाले होते. सगळ्यांच्या डोक्याला मुंग्या आल्या होत्या.अशी या भीक मागणाऱ्या पोरांची डेअरिंग वाढलेली सगळ्यांना दिसत होती.एवढ्या लहान वयात त्यांच्या मनात भिकारी हा धंदा ओरबडून जन्मताच कोरलेला दिसत होता.त्यांच्या हाताला एवढ्या लहान वयात एवढ्या मोठ-मोठ्या रक्कमा लागायला लागल्या होत्या.अपेक्षा पेक्षा जास्त रोजंदारी सहज फिरता फिरता मिळायला लागल्या होत्या त्यामुळे त्यांची भाषा खोसणारी होती.आणि त्यांना आडवणार कुणीच नाही म्हटल्यावर ,ते कायदा-शासन याला जुमानायला तयार नाही.मुख्य म्हणजे कायदा असून,तो बेदखल असल्यामुळे मनमर्जीने उघड झाप करायची मुबलक हिंम्मत सहजा-सहजी मिळाली असल्यामुळे त्याची भीती त्यांच्या मनाच्या कोणत्याच कोपऱ्याला कधीच डिवचली नव्हती. त्यांना कायद्याची भीती दाखवणारा,चांगल वाईट सांगणारा,तुम्ही जे करता तो गुन्हा आहे असे समजून-उमजून सांगणारा,पाप-पुण्य समजवणारा आजवर त्यांना भेटला असेल-नसेल,हिंम्मत केली असेल-नसेल,काहींनी पुढाकार घेतला असेल-नसेल सातत्याने कुणी पाठलाग झाला-केला असेल- नसेल किवा जाऊद्या म्हणून कानाडोळा केला असेल-नसेल,अशाच काही कारणाने कुणाचेच त्यांच्याकडे लक्ष नाही म्हटल्यावर मग कशाला ते शाळेची वाट धरतील.कशाला ते कामे धंदे करतील.ते कशाला व्यवसायाची,नोकरीची आशा करतील-धरतील.एवढा रोज हाडाच पाणी करणाऱ्या मजूराला,कामगाराला,छोट्या-छोट्या उद्योग मालकांना ही कधी-कधी एवढी रोजंदारी मिळत नाही.आणि भिकाऱ्यांना ते सहज मिळते. आपण बोलता-बोलता म्हणतो ना..,सहज मिळणाऱ्या वस्तूच मुल्य नसत.ते अगदी खरं.. आज बाल भिकाऱ्यांवर बोलायचचं झालं तर जवळ-जवळ वाच्याच मुकी झालेली दिसते.काय बोलावं...आणि कुणा-कुणाला बोलावं...समजण्या पलिकडे गेलेले दिसते.कारण मेहनत करण्याची कुणाचीच तयारी उरलेली दिसत नाही.या पोरांना आणि माय-बापानां आयत खायची सवय लागलेली आहे.विना मेहनतीचा हातात सहज पैसा यायला



लागला आहे.आणि लोक भावूक होऊन लहान लेकरांना भिक घालतात. म्हणून लहान-लहान पोरांना भिक मागायला पुढे केलं जावू लागलं.लोकं मायेच्या पोटी रुपया- दोन रुपये टाकतातच.आणि कुणाकडे सुट्टे नसले तर कधी-कधी पाच-दहा रुपये ही देणारेही हात घावतात.एखाद्या वेळेला. दिवस भरात पाचपन्नास दुकान केलं कि झालं. नाहीतर दुपार पर्यंत बस स्थानक, रेल्वे स्टेशन, धार्मिक स्थळे, ऐतिहासिक स्थळे,बाजार पेठेत या ठिकाणी गेलं तरी रोजंदारी कशीही निघून जाते. दिवसभराचा रोज सहज निघून जातो.दुपार नंतर एकही भिकारी दिसणार नाही.त्यांना माहिती आहे. दुपारी कुणीच सापडत नाही.ते फक्त सकाळी-सकाळी आणि सिटी मध्ये तर दिवसभर फिरतांना दिसतात.बाकी वेळ मस्त मजा..आराम करतांना दिसतील.त्यांचा भिक मागण्याचा टाईम सकाळी आठ वाजेपासून ते बारा वाजेपर्यंतचा पाहायला मिळतो. या वेळात ते जास्त संख्येने सिग्नल,धार्मिक स्थळे, गर्दीचे सार्वजनिक ठिकाणे,बस स्टँड,रेल्वे स्टेशन या ठिकाणी तर हल्ली मुक्कामीच दिसतात.या सगळ्या परिस्थीचा कर्ते-धर्ते त्या पोरांचे माय-बाप आहे.त्यांच्या दुर्लक्षितपणामुळे -मार्गदर्शनामुळे,द मदाटीमुळे,त्यांच्या पाल्यांनी त्यांच्या माय बापांच्या पावलावर-पाऊल टाकून जणू त्यांचा तो धंदा त्यांना वारसा हक्काने मिळाला आणि तो ते पुढे वंशाच्या दिव्याप्रमाणे पिढ्यानपिढ्या चालवायचा निश्चय या भिकाऱ्यांनी केला.त्यांच्या मागे त्यांचे पोरही त्यांचाच धागा-दोरा पुढे घेऊन जातांना दिसत आहे.त्यांनीही पैसे मिळवण्यासाठी भीक मागण हाच सहज सोपा वाटणारा मार्ग या बाल वयाच्या पोरांनी निवडलेला दिसत आहे.आणि त्यांनाही त्यांच्याच माय बापानी तयार केल्याच कळत.शिकवणी नि साह्याशिवाय हे पोर एवढे मोठे धाडस करणारच नाही हे निश्चित.

हाताला सहज पैसे लागल्यामुळे पाल्य व्यसनाच्या आहारी जातांना दिसत आहे.पैशांची कमाल खरच लय न्यारी आहे.खिशात असला तरी डोकं काम करत नाही.आणि खिशात नसला तरी डोकं काम करत नाही.असला तरी ताण,नसला तरी ताण.पैसा कमी असला तर त्यासाठी मरणाची धडपड आणि जास्तीचा झाला की खर्चाच टेंशन. तसच या पोरांच्या हाताला कमी वयात मोठ-मोठ्या रक्कमा हाताशी लागायला लागल्या. त्यातल्या त्यात त्यांना विचारणार आणि हिशोब मागणार कोणी नाही.मग खर्च कसा करायचा तर मद्यपान करून,सिगारेट,बिड्याकाड्या ओढून,गुटखे खाऊन मजा मारुन घ्यायची.अशा पैशाच्या गैर वापराने हे बाल भिकारी अहंकारपणाने व्यसनांच्या अधीन गेल्याचे दिसते.पैशाच्या आणि व्यसनेच्या लालची पोटी शाळा शिकण्याची त्यांची इच्छा मेल्यात जमा झालेली दिसते.पालकांचे व्यसनांचे शौक पुर्णत्वाला नेण्यासाठी लहान लेकरांचा बळी चढवलेला पाहायला मिळतो.पालकांनी पोरांना दारु,गुटखा, गांजा, सिगारेट,बिड्याच्या या सगळ्यांच व्यसनं,भिकेच्या आहारीं घालण्यासाठी मुलांना,बायकांना लावून दिल्याच दिसून येत.व्यसन करायचे म्हणजे पैसे लागतो.आणि पैसे कमवायचे म्हणजे मेहनत करावी लागते.आणि मेहनत करायची जीवावर येत.म्हणून सोपा-सापा धंदा आहे तो म्हणजे भीक मागणे.मग पोर-म्हातारे कोतारे व्यसनासाठी पैसे मागत सुटतात.पण त्यांना मायेच्या पोटी खायला द्या.चांगल-चांगलं तर ते घेत नाही.पैसे द्या म्हणता. पोटाला अन्न नको.पण कटोऱ्याला रुपयाच दान द्या तेवढं.अस बिनलाजीपणे म्हणतात.

एकदा एका धार्मिक स्थळांवर एक किस्सा घडला. शुद्ध तुपात न्यास बनवली होती-( गोड भात ) तिथं येणारा प्रत्येक भक्त आनंदाने ती न्यास प्रसाद म्हणून घेत होता.अशीच न्यास वाटता-वाटता तिथं समोर बसलेल्या भिकाऱ्यांच्या रांगेत ती न्यास नेली. आश्चर्य वाटलं. त्या भिकाऱ्याच्या प्रतिक्रिया पाहूण धक्काच बसला.बघतो तर काय..एकही भिकारी ती न्यास घ्यायला तयार नाही.आणि तोंडानं म्हणतो पैसे द्या...पैसै...न्यास नको...हातातल कटोर वाजवून,या कटोऱ्यात पैसै द्या...पैसे द्या...अन्नदान नको..पैशाचे दान धर्म करा..असा बिनलाजीपणाने म्हणत होता. ज्या भिकाऱ्यांनी लाजत -गाजत न्यास घेतली होती. ती तशीच त्या धार्मिक स्थळाच्या अवती-भवती पायाखाली तुटवतांना दिसत होती.अशा या ढोंगी लालची लोकांवर माया दया दाखवली आणि उलटी भवली.अशा लोकांची किवं करायलाच नाही पाहिजे मुळात.जो गरजू अन्नाचा भिकारी आहे.अशाच लोकांना खऱ्याअर्थाने मदत गेली-झाली पाहिजे.या भिकाऱ्या पालकांचा आयधीपणा गगनाला भिडलेला दिसून यायला लागला आहे.पोरांच्या जीवांवर व्यसनांची उतमात करतांना नजरेला आता बघवत नाहीये.

कामाधंद्याच जीवावर येतं म्हणून बाराही महिने चालणारा सोपा-सापा धंदा म्हणजे भीक मागणे आहे.त्या धंद्यात सगळा नफा आपलाच आहे. जेवढ मागितलं तेवढं आपलंच वाटाघाटी काहीच नाही.निव्वल नफा.जी.एस.टी.नाही.कुठलाच काही खर्च नाही.गुंतवणूक नाही.डोक्याला ताण नाही. पुन्हा दिवसभर आरामच-आराम.म्हणूनच भिकारी धंद्याने,भिकाऱ्यांना कामचोर बनवले. पोरांच्या जीवावर पंढरी म्हणून,आता लोक गळ्यात कवड्यांची माळ ,मस्तकी भंडारा,आणि हातात परडी घेऊन कुणीच भीक घालत नाही.त्यामुळे दुसरा मार्ग म्हणून पुढे भिकाऱ्यांनी पोरांना आणि म्हाताऱ्या लोकांना पुढे घातलेलं दिसून येत.आणि मार्केटचा सर्वेअभ्यास करुन,त्यावर तोडगा काय तर..आता पोरांना आणि म्हाताऱ्या माय बापांना या धंद्यात उतरवून भिकेचा धंदा चालवायचा. पालकांच्या धमक्या पोटी,आत्याचारापोटी,बळजबरीने या धंद्यासाठी तयार केल जाते.बळजबरीने त्यांना भिकमागणीसाठी तयार केले जाते.पोरांना मारुन झोडून,अपंग करुन,चटके देऊन,उपाशी ठेवून,व्यसनी लावून, पैशाची लालूच लावून त्यांच्याकडून भिक मागून घेतली जाते.व्यसनाची भूख वाढल्यामुळे,भिकेच्या आमदनीतून भागत नसल्यामुळे भिकेला जोडधंदा म्हणून चोऱ्या - माऱ्यांचे उलट-सुलट धंदे ही सुरु केल्याचे दिसून येते.पोर,माणस,बायका,हिंडता-फिरता दारासमोर पडलेली वस्तू,लहान मुलांची खेळणी,बाहेर वाळीत घातलेले,कपडे,भांडे,जे दिसेले ते लंपास करण्याचे काम ह्या भिकाऱ्यांची टोळी पार्ट टाईम जॉब म्हणून करतांना दिसते.या समस्येला कायमचा आळा घालण्यासाठी,शासनाने बालकामगार या समस्या बरोबर बाल भिकारी या समस्यांवर एकदा प्रकाश टाकावा आणि पालकांच्या विरोधात सक्त कारवाईचे शासन व्हावे कारण या सगळ्यांच्या मागे-पुढे त्यांचे पालकच असतात हे नक्की.तेच त्यांना अशा प्रकारची वागणूक देत असतात.आज जर,हे बाल भिकारी समीकरण सुटले नाही.तर उदयाला हे समीकरण जीवनभर अनुत्तरीत राहील.आणि उद्याच्या देशाच भविष्य पिढीजात मागासलेल राहील.



कल्पना घुगे
जालना


# आम्ही सावित्रीच्या लेकी...!

आधुनिक केसरी


**एक काळ असा होता कि स्त्रीला आपली मान उंचावून चालण्याचा ही अधिकार तिला प्राप्त नव्हता.'चूल आणि मूल' या समीकरणात तिला बंदिस्त करून ठेवण्यात आलेल होत.अनेक जाचक रुढींच्या ओझ्याखाली तिचं अस्तित्व पूर्णतः दाबल्या गेल होत.माणूस म्हणून जगण्याचा अधिकार तिला इथल्या समाज व्यवस्थेने नाकारला होता. स्त्रीला तिच्या अस्तित्वाची जाणीवच कधी होऊ दिली नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत समाजाचा उध्दार करायचा असेल सर्वात अगोदर स्त्रीयांना शिक्षण देणे गरजेचे आहे,ही महत्त्वपूर्ण बाब क्रांतीसुर्य महात्मा फुले यांनी लक्षात घेतली व सामाजीक अज्ञानाचा अंधकार दूर करण्यासाठी सर्वप्रथम स्त्रीशिक्षणाची मुहुर्तमेढ महात्मा फुले यांनी रोवली.**

या स्त्री शिक्षणाच्या कार्यात महात्मा फुले यांच्या खांद्याला खांदा लावून मुलींना शिक्षणाचे धडे देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सावित्रीमाई फुले यांनी केले व सावित्रीमाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका आहेत. तत्कालीन प्रस्थापितांच्या विरोधाला न जुमानता सावित्रीमाईंनी मुलींना शिक्षणाचे धडे देण्याचे कार्य अन्याय सहन करून निर्भिडपणे सुरू ठेवले. सावित्रीमाईंच्या या कार्यामुळेच आज विविध क्षेत्रात,विविध पदावर पंतप्रधान, राष्ट्रपती पदापर्यंत स्त्रीयांनी मजल मारली आहे.स्त्री जन्माला समृध्द करून दिलं ते सावित्रीमाईच्या कर्तृत्वाने! म्हणूनच आज मान उंचावते व अभिमामाने म्हणावेसे वाटते कि " होय! आम्ही सावित्रीच्या लेकी..!!"

स्त्रीयांना शिक्षण घेण्यासाठी घराचा उंबरठा ओलांडणे हे तत्कालीन परिस्थितीत सहज शक्य



नव्हते. स्त्रीयांनी शिक्षण घेणे म्हणजे पाप समजलं जायचं.त्या काळात सामाजिक उद्धारासाठी क्रांतीसुर्य महात्मा फुले व सावित्रीबाईंनी आपले सर्वस्व पणाला लावत १ जानेवारी १८४८ ला मुलींची पहिली शाळा सुरू करून स्त्रीयांना उंच भरारी घेण्यासाठी आकाश खुले करून दिले.महात्मा फुले व सावित्रीबाईंनी सुरू केलेला लढा हा केवळ शिक्षणप्रसाराचा लढा नव्हता तर त्यात सामाजीक परिवर्तनाची बीजं रोवलेली होती. म्हणुनच वेताळ पेठेत सुरू केलेल्या शाळेत शिक्षण घेतलेल्या मुक्ता साळवे या चिमुकलीच्या लेखणीत समाज व्यवस्थेतीला खडबडून जागे करण्याच ताकद निर्माण झाली. तिच्या लेखणीत क्रांतिकारी विचारांची मांडणी असल्याचे आपल्याला दिसून येते. आजमितीस समाजातील वास्तविक स्थितीचा आपण आढावा घेतल्यानंतर आपल्याला असे लक्षात येते कि, समाज परिवर्तनासाठी क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाबरोबर बालविवाह, बालहत्या, विधवा पुर्नविवाह या संदर्भात प्रस्थापितांना शह देत सुरूवातीचे क्रांतीकारी पाऊल



उचलले, शेवटपर्यंत सामाजीक उद्धारासाठी लढत राहिले. पण बालविवाह, स्त्रीभृणहत्या, हुंडापध्दती हे प्रश्न समूळ नष्ट झालेले नाहीत. स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढले, स्त्रीया शिकल्या परंतू सुशिक्षित झालेल्या महिल्यासुध्दा आजही अंधश्रध्दा यात गुरफटलेल्या दिसतात. जाचक रुढी-परंपरा त्या आजही सोडायला तयार नाहीत. चिकित्सक वृत्ती, वैज्ञानिक दृष्टीकोन यापासून त्या दूर आहेत. केवळ शिक्षण घेऊन पदव्या प्राप्त केल्या म्हणजे आम्ही सावित्रीच्या लेकी झालो का? हा प्रश्न मनाला पडतो. तेव्हा उत्तर 'नाहीच' असे येईल. जर आम्हांला सावित्रीचा हा समृध्द वसा अखंड चालवायचा असेल आणि सावित्रीच्या लेकी म्हणून अभिमानाने जगात वावरायचे असेल तर शिक्षणाबरोबरच सावित्रीच्या विचारांची वैचारिक ज्योत आपल्या विचारात पेटवणे गरजेचे आहे. तेव्हाच ख-या अर्थाने मान उंचावून अभिमानाने छाती ठोकपणे जगाला सांगता येईल कि,"होय ! आम्ही सावित्रीच्या लेकी..!

# सावित्रीबाई : मराठीतील उत्कृष्ट आद्य कवयित्री



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या देशातील आद्य शिक्षिका, मुख्याध्यापिका आहेतच, याशिवाय त्या उत्कृष्ट आधुनिक कवयित्रीही आहेत. भारतीय स्त्री मुक्तीच्या व स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, प्रथम शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा आज, ३ जानेवारी जयंतीदिन. स्त्री उद्धारासाठी आपले सर्वस्व वाहून देत महात्मा ज्योतिराव फुले यांनी हाती घेतलेल्या समाजोद्धाराचा वसा तितक्याच नेटाने पुढे नेणाऱ्या सावित्री बाई फुले यांनी साहित्य लेखन करून मराठी साहित्यात आपला ठसा निर्माण केला. स्वातंत्र्याच्या १००वर्षे आधी सावित्रीबाई फुलेंनी स्त्री शिक्षण, बालविवाहास विरोध, पुनर्विवाह, केशवपन बंदी, बालहत्या प्रतिबंध यासारख्या कार्यात महात्मा फुलेंच्या बरोबरीन काम केलं.**

स्त्रीयांना शिक्षित करण्यासाठी आणि त्यांच्या सन्मानासाठी सावित्रीबाई फुलेंनी आयुष्यभर कार्य केले.है सामजिक कार्य करत असतताना त्यांनी काव्य लेखन करून मराठी भाषेला समृद्ध केले. बावनकशी, सुबोध रत्नाकर या कावयसंगह लिहिले.१८५४ साली सावित्रीबाईंचा काव्यफुले नावाचा कवितासंग्रह प्रकाशित झाला. त्यात ४१ पैकी १२ कविता मोडी लिपीत आहेत. सावित्रीबाई एक उत्तम लेखिका आणि कवयित्री होत्या. त्यांनी १८५४ मध्ये “काव्यफुले” आणि १८९२ मध्ये “बावन काशी सुबोध रत्नाकर” असे लेख आणि “गो, गेट एज्युकेशन” नावाची कविताही प्रकाशित केली. शिक्षिका, लेखिका, कवियित्री, माता, समाजसेविका अशा विविध भूमिकेतून सावित्रीबाईंनी समाजातील गोरगरीब, दुर्बल घटकांची सेवा करण्यात आपले सारं आयुष्य पणाला लावलं. समाजातलं स्त्रीदास्यत्व मिटविण्यासाठी स्त्रियांनी शिकून सवरुन स्वावलंबी बनावं, म्हणजे त्यांना आपल्या खऱ्या शक्तीची ओळख होऊन पुरुषप्रधान समाजाची गुलामगिरी पत्करण्याची वेळ येणार नाही, असं ठाम मत त्यांनी स्त्रियांपुढे मांडलं. त्यांच्या आयुष्याच्या आणि कामाच्या अनुभवामुळे त्या एक स्त्रीवादी बनल्या होत्या. त्यांनी स्त्रियांच्या हक्काबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी “महिला सेवा मंडळ” सुद्धा स्थापन केले होते. त्यांनी महिलांसाठी सार्वजनिक जागेची मागणी केली जिथे सर्व जातींच्या महिला एकत्र येऊ शकतील. त्यांनी ‘होम फॉर द प्रिव्हेंशन ऑफ़ इन्फिडिसाईड’ नावाने महिलांचे आश्रयस्थान उघडले.



**काळरात्र गेली। अज्ञान पळाले।। सर्वा जागे केले। या सूर्याने ।। शूद्र या क्षितीजी ।जोतिबा हा सूर्य ।।तेजस्वी अपूर्व। उगवला!**

अशी जोतिरावांना ‘ज्ञानसूर्य’ मानणारी महान कवयित्री अठराव्या शतकातील प्रेरक व प्रेरणादायी कवयित्री होती. १८११ साली जोतिरावांच्या पश्चात सावित्रीबाईंनी जोतिरावांचे एक पद्यमय चरित्र लिहिले आहे. त्याचे नाव ‘बावन्नकशी सुबोध रत्नाकर’ हा काव्य चरित्रग्रंथ दस्तुरखुद्द सावित्रीनेच लिहिला आहे. फुले चरित्राबाबत तो अत्यंत विश्वसनीय दस्तऐवज मानला पाहिजे. महिलांनी अंधश्रध्दांच्या व जुनाट गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न करून महिला सेवामंडळाची स्थापना केली. त्याव्दारे स्त्री जागृतीसाठी सर्वांगीण प्रयत्नांची पराकाष्टा करून स्त्री मुक्ती आंदोलन उभारले. दीनदलीतांची रखरखत्या उन्हात पाण्यासाठी होणारे हाल पाहून स्वतःच्या घरचा हौद खुला केला. इ.स. १८७६-७७ च्या दुष्काळात फुले दांपत्यानी मिळेल तिथून अन्न जमवून ५२ अन्नछत्रालये चालविली. त्यात बारा वर्षाच्या आतील दोन हजार बालकांना अन्न मिळू लागले. यावरून त्यांच्या मनाची महती, हृदयाचा, दिलदारपणा व लोकहितवादाची तयारी लक्षात येते. दीन दुबळ्यांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा होय असे त्या म्हणत असत सर्व मानवजात एकाच परमेश्वराची लेकरे आहेत तर उच्च-नीच हा भेदभाव का? धर्म बुडाला म्हणून खूप आकांडतांडव झाले पण त्या डगमगल्या नाहीत. केवळ शिकविणे महत्त्वाचे नाही तर मातेच्या ममतेने पोटाशी धरले पाहिजे. सेवा सुश्रूषा केली पाहिजे. पोटापाण्याचा प्रश्न सुटला पाहिजे. ही शैक्षणिक तत्वे सांगणारी तत्ववेत्ती स्त्री म्हणजे सावित्रीबाई. अतिशूद्रांसाठी घरचा पाण्याचा हौद खुला करून दिला. श्राद्धाला सर्वांना बोलाविले. दुष्काळात अन्नछत्र उघडले हा अदभुत चमत्कार होता. पुणे पापात बुडाले, कलिक्षणिक व समाजसुधारणांच्या चळवळीत स्वतःला वाहून घेताना तत्कालीन समाजातील सनातनी लोक नक्की नामोहराम करण्याचा प्रयत्न करतील याची पूर्वकल्पना असताना त्या कधही भयग्रस्त व चिंताग्रस्त झाल्या नव्हत्या. बहुजन समाजाला प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. त्यांची शैक्षणिक व सामाजिक चळवळ थांबवण्यासाठी अनेक कुटील डाव खेळले गेले पण सावित्रीबाईंनी कुणालाही दाद दिली नाही. इ.स. १८९७ साली पुणे व परिसरात प्लेगची साथ पसरल्याने इंग्रज सरकार कोणत्याही प्रकारची ठोस कारवाई करत नाही, हे लक्षात आल्यावर माईंनी ग्यानबा ससाणे यांच्या धनकवाडी-घोरपडी येथील मोकळ्या जागेत प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ वसलेल्या ससाणे यांच्या माळावर दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांना व त्यांच्या कुटुंबियांना आधार देऊ लागल्या. रुग्णांकरिता हॉस्पिटल काढून डॉ. यशवंतला नगरहून रजा काढून बोलावले व रुग्णाची सेवा करायला सांगितले.मुंढवा येथी १० मार्च १८९७ रोजी रात्रौ ९ वाजता वयाच्या ६६ व्या वर्षी युगस्त्रीचे निर्वाण झाले. स्त्री शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मानाचा मुजरा. सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक कार्यातील मोलाच्या योगदानामुळे त्यांचा जन्मदिवस हा ‘बालिकादिन’ म्हणून साजरा केला जातो.

# 'झोप लागते कशी आनंदी, काम करुनिया थकून बघ तू'

## संयमाचा परीघ



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226



चित्र : बाबूराव पाटील, भोकर

भाग : ९

**अविश्वसनीय राजकीय हालचालींचा काळ :**
***मागचं वर्ष प्रचंड ताण-तणावपूर्ण गेलं. विश्वास, निष्ठा, समर्पण, त्याग, बांधिलकी या शब्दांवरचा विश्वासच उडून गेला. "एवरी थींग इज फेअर इन लव्ह & वॉर"- अर्थात "प्रेमात आणि युद्धात सगळं काही क्षम्य आहे". या विधानाचा प्रत्यय आला. राजकारणानं अविवेकी डावपेच आणि फोडाफोडीच्या बाबतीत किळसवानेपणाचं टोक गाटलं. किमान महाराष्टा संदर्भात तरी 'राज्यपाल' या पदानं आपला आदरार्थी अर्थ गमावल्याचा वारंवार प्रत्यय आला. 'सत्तेच्या हातातलं बाहुलं' का म्हणंत असतील एखाद्या पदाला, याचाही जगजाहीर प्रत्यय घेतला सर्वांनी. धर्म-अधर्म, सत्य-असत्य, यौग्य-अयौग्य, नीती-अनीती, यातील सीमारेषाच पुसून टाकली राजकारणानं.'कशाला चांगलं म्हणावं' आणि 'कुणाला चांगलं म्हणावं' हा गंभीर प्रश्न विवेकी मनुष्याला पडला. राजकारणातील नीतीमूल्यांच्या बाबतीत कुरघोडी आणि निसाकपणानं समाज रसातळाला गेल्याची संपूर्ण खात्री पटवणारं वर्ष म्हणून २०२२ ची नाविलाजास्तव दुःखद नोंद करावी लागेल. धर्माची भलावन करणा-या मंडळींनीच अर्वाच्य भाषा, अशोभनीय वर्तन, उत्तान उन्माद आणि विकारी विधानांनी कळस गाटला या काळात. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतीक, आरोग्यविषयक साहित्तिक अशा सगळ्या पातळ्यांवर समाज पार रसातळाला जाताना पाहिला या काळात आपण. प्रचंड उद्वीग्नता अनुभवली आपण. या आणि अशा कितीतरी संवेदनशील मनाला छळणाऱ्या किती तरी कारणांनी 'दै अधूनिक केसरी'तून मी 'संयमाचा परीघ' हे विवेकी, संतुलीत वैचारीक लेखमालेचं सदर दर मंगळवारी मी लिहायला घेतलं.निकस नाचताहे थयथया उरावर आणि सकसाने साधं बोलूही नये, हे प्रतिभेची थट्टा झाली आणि ती या काळानं निकसांची भलावण करुन बऱ्यापैकी केली याचा जाहिर निषेधच नोंदवायला हवा या काळाच्या नावे.***

***थोर साहित्यिक अण्णाभाऊ,साठे, शरदचंद्रजी पवार साहेब आणि केंद्रिय मंत्री नितीनजी गडकरी या तीन प्रतिभावंतांना सन्मानाने प्रदान केलेली मानद डी. लिट.सन्मान ही चांगली गोष्ट :***

**१) डॉ अण्णाभाऊ साठे :** फार तुरळक चांगल्या गोष्टी बघण्या ऐकण्यात आल्या. त्यातली मागच्या वर्षातली मनाला प्रसन्नता आणि उभारी देणारी गोष्ट घडली ती औरंगाबाद शहारात.दोन विद्यापिठांनी तीन चांगल्या व्यक्तीमत्वांचा अगदीच समर्पक गौरव केला मानद डी. लिट. ही माना-सन्मानाची पदवी प्न्दान करुन.'एम जी एम' अर्थात 'महात्मा गांधी मिशन स्वायत्त विद्यापिठा'ने मराठी साहित्याचे थोर साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांच्या वाङमयीन जीवनकार्याचा,त्यांच्या मराठी भाषा आणि मराठी माणसाची मान सन्मानाने उंचावणा-या प्रतिभेचा ऐतिहासिक गौरव 'मरनोत्तर मानद डि.लिट.' देवून केला.आपल्या विद्यापिठाच्या पहिल्याच पदविदान समारंभाचा हा असा सुवर्ण अक्षरांनी इतिहास लिहिला. समाजामनाच्या नैतिक जडणघडणीचं कार्य करणा-या साहित्याचं ऋण मानून साहित्यिकांना मानद डि.लिट. देणारं हे एकमेव विद्यापीठ ठरलं.

**२) डॉ. शरदचंद्रजी पवार :** याच मथळ्याचा दुसरा भाग असा की डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यापिठाने दोन निरंतर पारदर्शी आणि नितांत निस्वार्थी, नैतीक राजकीय नेतृत्वांना मानद डि.लिट. पदवीने सन्मानीत केले. एक होते राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.शरदचंद्रजी पवार साहेब आणि दुसरे बीजेपी चे माजी अध्यक्ष आणि सडक परिवहण आणि राजमार्ग मंत्रालयाचे केंद्रीय मंत्री आणि स्पष्ट वक्ते मा.नितीन गडकरी साहेब यांना. या दोनही नीतीमान, प्रतिभावंत राजकारण्यांनी मन मोकळं, समाजोपयोगी नीतीचं राजकारण केलं. आपापल्या पक्षीय भूमीकांमधील भेद-पोटभेद बाजूला ठेवून ही मंडळी नेहमीच आपल्या स्पष्ट वक्त्या वक्तृत्वानं आणि विवेकी अनुकरणीय कर्तुत्वामुळं भुरळ घालंत आली आहे.शरदचंद्रजी पवार यांनी कॅन्सरवर मात करुन पुन्हा नव्या दमानं आपलं आयुष्य पुर्ववत नितीमान राजकारणाच्या वळणावर आनुन ठेवलं. सत्तेचं राजकारण करताना समाजकारणाचा हिस्सा ऐशी टक्के असाचा आणि राजकारणाचा भाग वीस टक्केच असावा हे सुंदर गणीत पवार साहेबांनी मांडलं. आपल्या पक्षाचा प्राणवायू असलेले मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या ऐंशी टक्के निस्वार्थी समाजसेवेला आणि वीस टक्के राजकारणातीलही सेवाकार्याचा हा मानद डी. लिट. सारखी पदवी देवून केलेला सन्मान मनस्वी आनंददायी होता, जो या काळाने आपल्या भाळावर नोंदवून घेतला.

**३) डॉ. नितीनजी गडकरी :**
"रस्त्यांमुळं आमचं किमान चार पाच वर्षे आयुष्य वाढलं सर" मी घनसावंगीच्या म.सा.प.च्या साहित्य संमेलनाला जात असताना धारुर, तेलगाव, माजलगाव, आष्टी मार्गे गेलो, अवघ्या दोन ते आडीच तासात. सिमेंट- काँक्रीटच्या चौदरी रस्त्याने.ड्रायवरची ही उत्कट प्रातिनिधीक प्रतिक्रीया होती... 'नितीन गडकरी साहेबांनी आपल्या देशातल्या सगळ्या ड्रायव्हरचं आयुष्य वाढवलं बघा !' अगदीच सरळ आणि दिलखुलास मनमोकळं आणि स्पष्टपणे बोलणा-या देशाच्या केंद्रीय सडक परिवहण आणि राजमार्ग मंत्री महोदयांचं आयुष्य वाढवणारी आहे. चौपदरी, सहापदरी, आठपदरी रस्त्यांनी या बहाद्दरानं अवघा देश जोडला.हे एकमेवाद्वितीय काम नितीन गडकरी साहेबांच्या कार्यकाळात त्यांनी केलं,ही गोष्ट त्यांना इतिहासात कायमस्वरुपी संस्मरणीय करणारी आहे,त्यांच्या नावाची सुवर्ण अक्षरांनी करणारी आहे.

**चार चांगल्या वाईट गोष्टींनी प्रभावित केलेला आमचा काळ : १)** बाप म्हणून पार पाडावयाच्या महत्वाच्या कर्तव्यात लेकरा-बाळांचे शिक्षणं आणि त्यांचे विवाह आणि त्यानंतरचं नौकरी-कामधंद्यातलं स्थैर्य यांचा अंतर्भाव आहे. यातली एकही पायरी चुकली तरी कठीन प्रसंगांशी गाटभेट ठरलेलीच असते. आमच्या थोरल्या चिरंजीवाचं एम. ए. इंग्रजी आहे आणि आणि सेट परीक्षाही पास केली आहे. बी. ए. ला डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठातून सर्वप्रथम येवून आपल्या शिस्तशीर कठोर मेहनतीचा परीचय दिलेला आहेच त्याने. सरकार प्राध्यापक भरती करायला सारखी चालढकल करताहे मागील दहा पंधरावर्षांपासू.त्यामुळं थांबण्यात अर्थ नाही म्हणून अर्पीता राजाभाऊ शिंदे या आमच्या बारक्या मेहुण्याच्या सुशील कन्येशी थाटामाटात विवाह सोहळा संपन्न झाला. लेकराच्या लग्नाच्या मोठ्या जबाबदारीतून मुक्त झालो. घरात लेकी-बाळीची करतरता होती जी आमच्या अर्पीतानं (आप्पुनं) भरुन काढली. घरात असलेल्या आनंदात निरागस चैतन्याची भर पडली. या आनंदासाठी आमचे मेहुणे उत्तमराव शिंदे, प्रा. विलासराव शिंदे आणि राजाभाऊ शिंदें, आमचे साडू सोमनाथराव हनुमंते सह आमचे मामा शेषराव शिंदे यांचे आभार मानले पाहिजे.

२) याच वर्षाच्या शेवटच्या काळात आमचे भाच्चे चि. उमेश उत्तमराव शिंदे या कष्टाळू लेकराची 'एम पी एस्सी' परीक्षेच्या माध्यमातून वर्ग 'अ' अधिकारी म्हणून पाठबंधारे विभाग औरंगाबाद अंतर्गत उस्मानाबाद येथील कार्यालयात कार्यकारी अभियंता म्हणून महाराष्ट्र राज्य सेवेत रुजु झाले. मागील वर्षी रेल्वे स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातूनच धेळे जिल्ह्यात वर्ग रेल्वे खात्यात वर्ग 'ब' अधिकारी म्हणून रुजू झाले होते. एक वर्षाचा पर्यवेक्षा कालावधी नुकताच संपला होता आणि एमपीएससीने एक दिड वर्षापासून दिडसे पेंडींग अपॉइंटमेंट ऑर्डर्स काढून पदभरती केली. आमच्या मेहुण्याच्या बहिनीच्या परिवारासह आम्हा गणगोतासाठी ही मोठीच आनंददायी गोष्ट आहे. ३) मागील तीन वर्षापूर्वी पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शैक्षणिक सेवेत प्राथमीक शिक्षीका म्हणून रुजू झालेली आमची लाडकी भाच्ची सौ मयुरी सचीन मोगले हिचा तिन वर्षांचा शिक्षण सेवक कालावधी संपून ती ही पुर्ण स्लेकवर आली आणि तिचाही प्रचंड काटकसरीचा कालावधी संपला. प्रचंड संयमी आणि सुसंस्कारी मयुरच्या सेवा कार्यकाळातली ही पदोन्नतीही मोठी माना-सन्मानाची आणि तिच्या सासर, माहेर आणि आजोळच्या गणगोतासाठी मोठी आनंददायी गोष्ट आहे.

४) वर्षभर मला श्वास घ्यायला वेळ नव्हता आणि आताही किमान मार्च एंड पर्यंत नॅकच्या कामांमुळं फुरसद मिळेल की नाही याची शास्वती नाही देता येत. अशाही घुसमटीत याच वर्षात अण्णाभाऊंची लोकप्रिय कादंबरी 'फकिरा' मी इंग्रजी भाषेत अनुवादीत केली सलग २९ दिवसात.रात्रंदिवस फकिरा हा क्रांतीकारी तरुण आणि त्याचा जिगरबाज जीवनसंग्राम हाच एक विषय होता मनात. एक चांगलं ऐतिहासिक काम आपल्या हातून एकदाचं पार पडलं या वर्षात, हा आनंद कायमस्वरुपी राहील आयुष्यभर माझ्या मनात.

५) मागील वर्षातल्या चार चांगल्या गोष्ट सांगा म्हणालं कोणी तर मी सरळ दै.अधुनिक केसरीमधील मी दर मंगळवारी लिहित असलेलं 'संयमाचा परीघ' या सदराचा उल्लेख करीन. २०१७ नंतरच्या दै.पुण्यनगरी मधील माझ्या 'धैर्यबांधणी' या सलग वर्षभर लिहिलेल्या सदरानंतर २०२२ या वर्षाच्या शेवटी कांही एक छान सुरुवात केल्याचं सांगेन.

६) आवडीच्या किती तरी साहित्याच्या उत्सवांना साधी हजेरीही लावता आली नाही कामांच्या तगाद्यांमुळं.ही रुखरुख राहीलंच मनात कुणी काहीही म्हणालं तरी. एका संमेलनाचं अध्यक्ष पद स्विकारता आलं नाही. एका माना-सन्मानाच्या पुरस्काराचा स्विकारही करता आला नाही वेळेची उलब्धता न होवू शकल्यामुळं. किती तरी साहित्यिक उपक्रमांना वेळेच्या कारणांमुळ नाही जाता आलं. **नव्या वर्षाचं नियोजन !**
पंचवार्षिक, वार्षिक आणि दैनिक नियोजनही करतोच आपण नव्या वर्षाच्या हौसेनं.गेल्या वर्षात पदरात काय पडलं याचा लेखा-जोखाही मांडुन पहातो.हाती निराशा आली तरी, नवा जोम नवी आशा जन्माला घालतोच. शंभर गोष्टी करीन म्हणतो माणुस नियोजनाच्या भरात आणि प्रत्यक्ष कृतीची वानवा जानवते सालभर. हे असंच सुरु असतं माणसाचं सालोन् साल ! "**जुने जावू द्या मरणा लागुनजाळुन अथवा पुरुन टाका.**" असं केशवसूत म्हणाले तरी आठवनींचे बोचके आपण सालोन् साल सांभाळंत आलो आहोत. 'विस्मरणशक्ती' निसर्गानं दिली माणसांना ती कामातही राहिली पाहिजे.पण तसं होत नाही.प्रसंगा प्रसंगांनी फाईल्स खट्टकुन उघडंत राहतात.हवा तो डाटा वर येतोच.**पुर्ण करता येण्यासारखे संकल्प :**
आपण शिक्षण क्षेत्रात आहोत तर हे असं कांही मग...
१) छान आभ्यास करुन शिकवू लेकरांना वर्षभर आणि छान छान उपक्रम राबवू त्यांच्या मन आणि मेंदूला क्रियाशील ठेवू. वर्षभर लिहितं राहील मन याचाच साधा सोपा अर्थ असा की वर्षभर वाचन, चिंतन, मनन, लेखण, प्रकाशन सुरुच राहिल आणि नवनव्या प्रश्नांची उकल करणंही आलंच त्या अनुशंगानं. आपल्या सहवासानं आणि आपल्या शब्द-सहवासानं जगणं सोपं होईल यांचं भाव ठेवू. या लेखणाला वाचकांसमोर येण्यासाठी 'दै.अधुनिक केसरी' मधील 'प्रतिभेचा परीघ' हे सदर मी दर मंगळवारी लिहितोच आहे आणि दरवेळी नवं कांही घेऊन येत राहिलच.

२) वर्षभर कुणाची कुचीनिंदी करणार नाहीत आपण आणि यापुर्वीही कधी कुणाची केल्याचं आठवत नाही. मनाच्या खोल तळातुन काही वर आलं तर त्याच्या कविता गजलाही जन्माला येतीलच.मनाचं हे असं उत्सफुर्त आणि चिंतनशील भाव-भावनांचं प्रगटीकरण सातत्य ना मला आजवर मोडता आलं ना या काळाला ते करता येईल.मला कविता लिहिणं थांबवता येणं कदापी शक्य नाही. अगदीच आवघड आवस्था आली तर मी मनातल्या मनात लिहित राहीन ! ३) वर्षभर कुणाच्या कामात आपल्यामुळं व्यत्यय येणार नाही याची तसदी घेऊ. मुद्दामून कधी कुण्या चांगुलपणाची अडवणूक केल्याचं आठवत आणि वाईटपणाचं आपल्याला जगजाहीर वावडं आहेच आणि त्यात बदलही करण्याची आवश्यकता वाटंत नाही. ४वर्षभर कुणाबद्दल विनाकारण अपशब्द वापरण्याचाही विषय नाही आपला. वर्षभर नवनवी आव्हाणं स्विकारु आणि पेलूही.'पळकुटा' आपला स्वभाव नाही त्यामुळं 'पळ काढणे' हा विषयही नाही आगामी वर्षाच्या नियोजनात आपल्या.'निधड्या छातीनं संकटांना सामोरं जाण्यातच पुरुषार्थ असतो' हे आपल्या कवितेनं, गजलेनं या स्तंभलेखणानं जगून नाही सांगायचं तर कुणी मग ? ५) मन मोठे करामती करतं. कवयत्री बहिनाबाई चौधरी म्हणतात तसं ते फार चंचल आहे.संत तुकोबांनी मन करा रे प्रसन्न म्हणून सांगीतलं आणि त्यातूनच सर्व सिद्धी प्राप्त होतील म्हणाले.संत रामदासांनी मनाला सज्जन म्हणून भक्तीमार्गानं जगण्याचा संदेश दिला. तम बुद्धांनी त्याला स्थीर करण्याची विपश्यना साधना सांगीतली. तेंव्हा मनावर कंट्रोल करता येणं ही साधी गोष्ट नक्की नाही.सर्वांना शिक्षण त्यासाठीच आवश्यक आहे. आपल्या मनाला आपल्या ताब्यात ठेवणं फार गरजेची गोष्ट आहे. आपण आपल्या मनाचे मालक असणं ही खरी उपलब्धी आहे.मनाला विवेकी वळण लागलेले लोक या देशाचे नागरीक असणं हीच या देशाची खरी धन-दोलत आहे. या निमित्तानं मी लेकराबाळांना, विद्यार्थीवर्गाला आणि वाचक मंडळीला शेवटी हेच म्हणेन माझ्या ताज्या गजलेच्याच भाषेत...

*तुला हवे ते करून बघ तू*
*मनासारखे जगून बघ तू.*
*जगणे सुंदर होऊन जाते,*
*कवितेसोबत चलून बघ तू.*
*सदा सावली सोबत करते,*
*हात उन्हाचा धरुन बघ तू.*
*अन्यायाच्या विरुद्ध ताकत*
*लाव पणाला, लढून बघ तू.*
*उजेड पडतो अवती भवती,*
*पणतीवानी जळून बघ तू.*
*कुभांड रचने सोपे असते,*
*विटेवरी विट रचून बघ तू.*
*आवसानाने परत एकदा*
*पाय अजुनही रवून बघ तू.*
*झोप लागते कशी आनंदी,*
*काम करुनिया थकून बघ तू.*

**(लेखक मराठी भाषेचे साहित्यिक आणि इंग्रजी साहित्याचे संशोधन मार्गदर्शक आहेत)**

# सावित्रीबाई फुले यांनी काव्यफुलेंमध्ये स्त्री जीवन उत्थानासाठी केलेले लेखन



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**बाईल काम करीत राही । ऐतोबा हा खात राही पशू पक्षात ऐसे नाही । तयास मानव म्हणावे का? वरील प्रमाणे प्रश्न निर्माण करून घरातील स्त्री दिवसरात्र काम करत असताना पुरुषाने इतोबा बनून खाणे योग्य तर नाहीच कारण पशुतही हा असा दुर्गुण दिसत नाही मग अशा मानवाला मानव म्हणावे का? असा खडा सवाल विचारून समस्त स्त्री जातीचा कैवार घेण्याचे काम थोर समाज सुधारक सावित्रीबाई फुले ह्यांनी आपल्या काव्यातून सुद्धा केलेले दिसून येते. 3 जानेवारी 1831 रोजी जन्मलेल्या सावित्रीबाई जोतीराव फुले ह्या भारतीय शिक्षिका, कवयित्री व समाजसुधारक होत्या. त्यांनी आशिया खंडातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाच्या आरंभिक टप्प्यात त्यांचे पती थोर समाजसुधारक जोतीराव फुले यांच्यासह त्यांनी मोठी कामगिरी बजावली. आपल्या नायगाव या गावावर त्यांनी एक प्रसिद्ध कविता लिहिली आहे त्यावरून स्त्रीच्या मनामध्ये आपल्या माहेरा बद्दल अप्रूप असते याची आपल्याला जाणीव होते. जगाच्या पाठीवर स्त्रीसाठी सर्वात पडते गाव जर कोणते असेल तर ते तिचे माहेर असते. नायगाव खेडे सुखसमृद्धीचे असे। चालवी पाटीलकी, कारभारी नेवसे याच कुलामध्ये मी नारी जन्म घेतसे । असी जन्मभू मला वंदनीय प्रेम तियेवर जडे । गातसे तिचे गीत चहुकडे आपले माहेर किती समृद्ध आहे.**

तेथे आपले वाडवडील पाटीलकी करतात या अशा एका कारभारी कुलामध्ये आपण स्त्री रूपाने जन्माला आलो असून आपल्याला आपली जन्मभूमी वंदनीय असून आपण तिचा नावलौकिक वाढवणारे गीत सर्वत्र गाणार आहोत अश्या स्त्री भावना त्याच्या काव्यात दिसून येतात. आमची आऊ सारखी व्यक्तिपरीचय देणारी कविता सगुणाबाई क्षीरसागर ह्या त्यांच्या विधवा नातेवाईक स्त्रीवरील म्हणजेच ज्योतिरावांच्या मावस बहिणीला समर्पित आहे. त्यांनीच जोतीबाचा सांभाळ केला त्यांचे व्यक्तिमत्व आपल्या काव्यामधून मांडताना सावित्रीबाई म्हणतात,

*आमची आऊ ।फार कष्टाळू प्रेमळ होती*
*होती दयाळू सागर वाटे*
*उथळ क्षणी आभाळ ठेंगणे ।तिच्याहुनी*
*विद्यादेवी हृदयी आम्ही ।तिला साठवी*

असे म्हटले जाते की स्त्री शिक्षणाची प्रेरणा महात्मा फुले यांना त्यांच्या मावस भगिनी सगुणाबाई क्षीरसागर यांच्याकडून मिळाली. सावित्रीबाई आणि ज्योतिराव यांच्या लग्नापासून तर त्यांच्या सर्व सामाजिक कार्यामध्ये साथ देणाऱ्या सगुणाबाईच्या कार्याची दखल सावित्रीबाईंनी आपल्या कवितेतून घेतली आहे. स्त्री शिक्षणाचे उद्धार करते आणि समस्त स्त्रीजातीला अनिष्ट परंपरेच्या जोखडातून बाहेर काढण्यासाठी धडपडणाऱ्या आपल्या आपल्या जीवनसाथी आणि प्रेरणास्थान असलेल्या दैवता बद्दल सावित्रीबाई वंदन करत म्हणतात,

*ज्योतिबांना नमस्कार ।मनोभावे करतसे*
*ज्ञानामृत आम्हां देई ।अशा जीवन देतेस*
*थोर जोती दीन शूद्रा ।अतिशूद्रा हाक मारी*
*ज्ञान ही ईर्षा देई ।तो आम्हाला उद्धरी*

आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी वाहणारे त्यातही स्त्री शिक्षण, विधवा पुनर्वसन, केशवपन प्रथा विरोध इत्यादी साठी पुढाकार घेऊन स्त्री जन्माचे दास्य नष्ट करणाऱ्या ज्योतिबा फुले ह्यांना सावित्रीबाई काव्यनमन करतात ते स्त्रियांच्या प्रतिनिधी म्हणून आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, तर तेच ज्योतिबा आपले पती आहेत आपले सर्वस्व आहेत ह्या जाणिवेतून एका सुखी सहचारिणीच्या भूमिकेतून त्या म्हणतात,

*माझ्या जीवनात ।जोतिबा स्वानंद*
*जैसा मकरंद ।कळीतला ॥ऐसा भाग्यवंत*
*असेल तुजला ।नसे आनंदाला ।पारावार*

ज्योतिबा म्हणजे जणू कळीतला मकरंद, इतका गोडवा त्यांच्या सहवासात असून ते माझ्या जीवनात आहेत म्हणून मी खूप भाग्यवान आहे अशी स्वच्छ कबुली सावित्रीबाई ह्यांनी दिली आहे त्या काळात इतकी भावना व्यक्त करणेही फार धाडसाचे होते ते धैर्य त्यांना ज्योतिबाच्या मुळेच मिळाले होते हेही आपण लक्षात घेतले पाहिजे. कळी आणि फुले ह्या प्रतिमा त्यांनी आपल्या काव्यात इतरत्रही वापरल्या आहेत. 1854 मध्ये प्रकाशित पहिल्या काव्य संग्रहाचे नावच त्यांनी काव्यफुले असे दिले आहे ते त्यांच्या फुले घराण्याचा गौरव करणाऱ्या किंवा फुले परिवारातील व्यक्तीचे काव्य ह्या अनुषंगानेही आपण घेऊ शकतो. जाईची कळी ह्या कवितेत सावित्रीबाई म्हणतात,

*तिचे तरुणपण छान विकसले पंचदळी असे कळी जाईची*
*रात्री बनते जणू रती ती सुगंध खेळवी कळी जाईची*

जाईची कळी म्हणजे जणू अल्लड बालिका, तिचा विकास होऊन तिचे फुलात रूपांतर होणे म्हणजे बलिकेचा पोक्त स्त्री रूपापर्यंतचा प्रवास असा सुंदर दाखला देत सावित्रीबाई स्त्रीचे जीवन आणि फुलाचे जीवन यातील अलवार साम्यता दाखवतात. रती हे सुंदर स्त्रीचे प्रतीक सुद्धा त्यांनी या ठिकाणी वापरले आहे. त्यावरून निसर्गाचे आणि स्त्रीचे किती विलोभनीय नाते आहे हे आपल्या काव्यरचना मधून सावित्रीबाई यांनी दाखवून दिले आहे. अशा नाजूक सुंदर कळ्यासोबत आणि निर्मळ मनाच्या स्त्रियांच्या सोबत फुलपाखरा प्रमाणे सुंदर दिसणारा पुरुषी समाज किती निर्दयपणे वागतो हे फुलपाखरू ह्या कवितेतून त्यांनी दर्शविले आहे,

*त्यास पाहुनि भुलून गेली, आतुर होई कळी फुलांची*
*होती कोवळी भारी सुंदर, मनाने झाली प्रमिला त्याची*
*अतिशय निरामय सुंदर सुरुवात असलेली ही कविता*

फुलपाखरा कडे कळीचे आकृष्ट होणे, तिने त्याला मनाने वरणे या, त्याला इशारा करून बोलावणे इथपर्यंत सुखावह वाटते आणि नंतर मात्र त्याच कवितामध्ये,

*रूप तियेचे करी, विच्छिन्न , नकोसे केले तिजला त्याने*
*शोषुन काढी मध तियेचा, चिपाड केले तिला तयाने*
*चव घेऊन करी दूर ती, तीजकडे ते जरा न पाही*
*तिला टाकुनी दुसरीकडे, जावयास त्या लाजही नाही*
*कोण कोठली कळी फुलाची, जुनी विसर नवीन पाही*
*रीत जगाची उच्छृखल ही पाहुनिया मी स्तिमित होई*

अशा शब्दांमधून स्त्रीचे शोषण, तिचे शरीर ओरबाडून घेणे, तिचे शारीरिक हाल करणे आणि मन तृप्त झाले की तिला टाकून दुसरीकडे जाण्याची वृत्ती असलेल्या पुरुषाला सावित्रीबाई फुलपाखरात पाहत आहेत हे आपल्या लक्षात येते. मात्र असे शोषण करून दुसऱ्या स्त्रीकडे जाताना त्याला लाज कशी वाटत नाही असा सवाल सुद्धा सावित्रीबाई फुले ह्या कवितेतून करतात आणि पुरुषी जगाची ही वृत्ती पाहून आश्चर्य व्यक्त करतात. कारण त्यांच्या मनातील स्त्री सुलभ कोमलता पराकोटीची आहे, अगदी बाहुली सारख्या निर्जीव वस्तूमध्ये सुद्धा त्या कमालीचा जीव गुंतावताना दिसतात,

*खेळ ग ताई ती वदली, फेकी मज वर मग झेली*
*तिचे ऐकुन जीव भ्याला कसं फेकू मी वर तिजला*
*असे खेळुनि खाली पडुनि जाईल मरुनि*

बाहुलीला वर फेकल्यावर जर ती खाली पडली तर ती मरुन जाईल अशी भीती त्यांना लहानपणी वाटत असे ती स्त्री सुलभ कोमलता अंगी असल्याने त्यांना स्त्री वरील अत्याचार करणाऱ्या समाजाबद्दल आश्चर्य वाटते. स्त्रियांच्या वरील ही गुलामी आणि अत्याचार दूर होण्यासाठी शिक्षण महत्वाचे आहे असे निक्षून सांगत एका कवितेत त्याच्या कवितेतील सर्व मुली म्हणतात,

*सरस्वतीच्या दरबारात शिक्षण घेणेस जाऊ*
*चला विद्यादेवीस प्रसन्न करूनि वर मागू*
*तिजला चला अज्ञानाची दारिद्राची गुलामगिरीही तोडू चला*
*युगायुगाचे जीवन आपले फेकून देऊ चला चला*

स्त्रियांच्या शिक्षणामुळे स्त्रीच्या अज्ञान, दारिद्र्य आणि स्त्रीची गुलामगिरी दूर होईल, युगायुगाची ही बंधने आणि जोखड स्त्रीच्या आयुष्यातून दूर होतील असे सावित्रीबाई स्पष्टपणे सांगतात. त्याच बरोबर हे शिक्षण घेत असताना इंग्रजी विषय शिकणे किती गरजेचे आहे ते सांगतात आपल्या दोन तीन कवितेमधून त्यांनी इंग्रजी माऊली असा शब्दप्रयोग केला आहे, त्यातून इंग्रजी भाषा सर्वांना एकसमान समजून सारखे ज्ञान देते असे वर्तन फक्त आईचे असते म्हणून इंग्रजीला माऊली म्हणणे त्यांना रास्त वाटते. आपली सामाजिक आणि शिक्षण विषयी अतिशय जागृत भूमिका असलेल्या सावित्रीबाई आपल्या कवितेतून महाराणी ताराबाई ह्यांचा गौरव करताना म्हणतात,

*कोल्हापूरची महान राणी छत्रपती*
*शोभते भूषणी शुभहस्ते तलवार*
*भवानी ताराबाई असुरमदीनी ताराबाई*
*माझी मर्दिनी भासे रणचंडिका रणांगणी*
*रणदेवी ती श्रद्धास्थानी नमन माझे तिचिये चरणी*

कोल्हापूरची महाराणी ताराराणी म्हणजे शिवछत्रपती वंशाचे भूषण होय, तिला मर्दिनी, रणचण्डिका असे संबोधन वापरून सावित्रीबाई त्यांना वंदन करतात आणि महाराणी ताराबाई आपले प्रेरणास्थान आहेत असे नमूद करतात, खरे तर कोल्हापूर म्हणजे महालक्ष्मी मंदिर प्रसिद्ध असलेले ठिकाण पण त्या ठिकाणी महालक्ष्मी सारखे दैवत सोडून ताराराणीला प्रेरणा मानण्यात आणि वंदन करणाऱ्या सावित्रीबाई देवभोळ्या नव्हत्या आणि त्या माणसात देव शोधणाऱ्या होत्या असे आपल्या लक्षात येते. ताराराणीचा गौरव करणाऱ्या सावित्रीबाई छत्रपती शिवरायांच्या बद्दल लिहितात,

*छत्रपती शिवाजीचे ।प्रातःस्मरण करावे*
*शूद्रादि अतिशूद्रांचा ।प्रभु वंदू मनोभावे*
*नळराजा युधिष्ठीर।द्रौपदी ही जनार्धन*
*पुण्यश्लोक पुराणात।इतिहासी शिवानन*

छत्रपती शिवाजी म्हणजे शूद्रा अतिशूद्रांचे राजे, शब्द पाळणारा नळराजा, सर्वांच्या साठी धर्मराज्य निर्माण करणारा युधिष्ठिर तसेच



आपल्या अपमानाचा सूड घेणारी, स्त्रीची अस्मिता जिवंत ठेवणारी द्रौपदी हिला इतर महापुरुषाच्या सोबत सन्मान देत त्यांनी स्त्रीत्वाचा सन्मान वाढविला आहे ह्यात शंका नाही.

*विंध्यावली बळीपत्नी ।उभयता अभिजन*
*मनोभावे बळीवंध्या ।त्याचे गाऊ संकीर्तन*

आजवर बळीराजाची कथा आणि काव्योल्लेख अनेक साहित्यिकांनी केला मात्र त्या बळी राजा सोबत त्याची पत्नी दानधर्म करताना बळी राजाच्या बरोबरीने कार्य करीत असे ह्या जाणिवेतून बळीराजा सोबत त्याची पत्नी विंध्यावली हिचा नामोल्लेख 1854 मध्ये प्रकाशित काव्यसंग्रहात सावित्रीबाई करतात ह्यातून त्यांचा अभ्यास आणि स्त्री अस्मिता किती जागृत होती ह्यांची जाणीव होते. सावित्री ज्योतिबा संवाद ह्या कवितेतून समाज जागृती आणि शूद्रांची उन्नती ह्याबाबत विचार मांडणाऱ्या सावित्रीबाई ह्यांनी ज्योतिबा फुले ह्यांच्या निधनानंतर खचून न जाता आपले समाज कार्य अखंडित पणे सुरू ठेवले ही अतिशय प्रेरणादायी गोष्ट भारतीय इतिहासाने पहिली आहे. काव्यफुलें मध्ये ज्योतिबाना नमस्कार करणाऱ्या सावित्रीबाईनी ज्योतिबांच्या निधनानंतर बावन्नकशी सुबोध रत्नाकर ह्या नावाने म ज्योतिबा फुले ह्यांचे पहिले चरित्रच काव्यातून लिहिले आहे. ज्योतिबांनी नेमके काय कार्य केले हे सांगताना पूर्वी नेमकी सामाजिक स्थिती काय होती हे सांगताना सावित्रीबाई म्हणतात,

*टीळा लावला आर्य जेते म्हणूनी*
*म्हणे उच्च आम्ही, कडू शूद्र योनी*
*गुलामी रूढी लादुनी धर्म सांगे*
*पशुतल्या जिणे स्त्रिया शूद्र भोगे*

समाज व्यवस्थेमध्ये स्त्रिया आणि शूद्र ह्यांना पशुसम वागणूक होती, स्त्री आणि शूद्र ह्यांच्यावर गुलामी लादलेली होती. असे सांगत त्या पुढे म्हणतात,

*मनू वर्ण कल्पी विषारी विकारी*
*अनाचार रूढी सदा बोचणारी*
*स्त्रिया शूद्र सारे गुलामी गुहेत*
*पशूसारखे राहती ते कुपात*

मनू ह्या राजाने वर्ण निर्मिले आणि स्त्री तथा शूद्र ह्यांना पशुसम वागणूक देत त्यांना गुलामीच्या गुहेत लोटून दिले त्यामुळे समाजात स्त्रीला आणि शूद्राला मानाचे स्थान राहिले नाही.

*तुला बोलवी रावबाजी धनी ग*
*स्वपत्नीस धाडी निर्लाजा पती ग*

अशा शब्दात राजाने मनात येईल त्या स्त्रीला व्यभिचारासाठी बोलवावे आणि निर्लज्जपणे पुरुषाने आपल्या पत्नीला त्याच्याकडे पाठवावे अशी स्त्रीची अवहेलना समाजात सुरू होती हे भयंकर वास्तव जळजळीतपणे सावित्रीबाई फुले ह्यांनी काव्यबद्ध केले आहे. ह्या सर्वातून समाजाला दिशा दाखविणाऱ्या ज्योतिबाच्या जन्माबद्दल माहिती देताना त्या म्हणतात,

*नऊ मास झाले चिमा माय मेली*
*चिमू जोतीची फार आबाळ झाली*
*परी त्याजला मानवी झोप घ्याया*
*मिळाली सगुणा महादेव-माया*

ह्या ठिकाणी चिमाबाई ह्या ज्योतिबांच्या जन्मदेत्या आईचे निधन झाल्यावर बाळ ज्योतिबांच्या हाल होऊ लागले त्यावेळी त्यांचा सांभाळ करण्यासाठी सगुणाबाई क्षीरसागर ह्या त्यांच्या मावस बहिणीची माया कामी आली, सगुणाबाईनी आईच्या ममतेने त्यांना वाढविले म्हणूनच आमची आऊ सारखी व्यक्तिविशेष कविता सुद्धा सावित्रीबाईंनी त्यांच्यावर लिहिलेली आहे. ज्योतिबांनी स्त्रियांच्या साठी जे कार्य केले त्याचे मुद्देसूद वर्णन सावित्रीबाईंनी केले आहे.

*पथा चुकल्या कामिनी पोटुशीना*
*प्रसूतिगृही सोय मोलाची नाना*
*सूईणी, दवा, पाणी, खाणे, पिणेही*
*व्यवस्था अशी सर्वच सावित्री पाही*

विधवा आणि घटस्फोटिक किंवा परितेक्या स्त्रियांना जीवनाच्या वाटचालीत मोह किंवा कुणी गैरफायदा घेतला तर प्रसूतिगृह उपलब्ध करून त्याची सर्वस्वी जबाबदारी सावित्रीबाईकडे देऊन ज्योतिबांनी त्याकाळात किती मोठे कार्य केले होते ते आपल्या लक्षात येते, सुईण, दवापाणी, खाणे राहण्याची उत्तम व्यवस्था म्हणजे जे माहेर स्त्रीला बाळंतपणात हवे असते तेच फुले दाम्पत्याने ह्या स्त्रियांना उपलब्ध करून दिले होते. म्हणूनच सावित्रीबाई पुढे ज्योतिबा यांचा गौरव करताना म्हणतात ते अवतरण फार महत्वाचे आहे असे मला वाटते,

*निराधार दुःखी स्त्रियांचा पुढारी*
*दुबळ्या अडाणी जनांचा मदारी*
*कृती तैसा खरा ज्ञानयोगी*
*स्त्री शूद्रा करीता इही दुःख भोगी*

ज्योतिबा फुले हे खऱ्या अर्थाने स्त्रियांचे पुढारी होते, त्याचप्रमाणे दिन दुबळ्या लोकांचे सुद्धा ते नेते होते, शिक्षणाचा प्रसार करणारे असे ते ज्ञानयोगी होते, स्त्रियांच्या न्याय हक्कासाठी आणि शूद्रांच्या उद्धारासाठी या पृथ्वीतलावर खूप कष्ट भोगले, असे सांगून बावन्नकशी सुबोध रत्नाकर म्हणजे शुद्ध देणारा समुद्र अशी उपमा त्यांनी ज्योतिबांना दिली आहे. सावित्रीबाई फुले यांचे सर्व जीवन स्त्री शिक्षण, स्त्रियांचे न्याय आणि हक्क यांच्यासाठी लढणे त्याचप्रमाणे दुर्लक्षित घटकांकडे लक्ष देऊन त्यांना शिक्षण सुविधा पुरवणे, स्त्रियांचा आणि शूद्रांचा उद्धार करणे, महात्मा ज्योतिबा फुले असताना त्यांच्यामागे खंबीरपणे साथ देत उभे राहणे आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या निधनानंतर त्यांनी स्वीकारलेले समाजकार्याची व्रत अखंडितपणे सुरू ठेवणे, स्त्री शिक्षण आणि स्त्री उद्धार यांच्या वेदीवर पेटलेली ज्योतिरुपी अखंडितपणे तेवत ठेवण्याचे महान कार्य सावित्रीबाई फुले यांनी केले आहे, त्यांच्या कवितेमध्ये सुद्धा तत्कालीन कालानुरूप काव्यमनोरंजन कोठेही दिसत नाही त्यांचे एकंदरच काव्य स्त्री कल्याण, शुद्रोन्नती आणि शिक्षण तथा महात्मा ज्योतिराव फुले यांच्या चरित्र आणि विचार ह्या बाबींचा समर्पित झालेले आढळून येते.

**(काव्यप्रदेशातील स्त्री : किरण शिवहर डोंगरदिवे ह्या अथर्व प्रकाशन जळगाव ह्यांनी प्रकाशित केलेल्या ग्रंथात समाविष्ट)**

# 'सावित्री' ज्ञान देणारी माय



प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

आधुनिक केसरी

**आज समाजात जेव्हा ज्योतिबाच्या कष्टाबरोबर त्याच्यासोबत उभी राहणारी सावित्री आठवते तेव्हा खरचं मन आनंदी होते का? अशी मनात एक वेगळीच कुशंका येते. जिचे नाव घेताना माना उंच झाल्या पाहिजेत तेथेच तिचे नाव घेताना नजरा खाली का झुलतात? हाच तर खरा प्रश्न आहे. आता झुकलेल्या नजरा ह्या आदराच्या आहेत कि शर्मेच्या हेच शोधायला हवं. आता ऐका तर सावित्री जिने मुलींच्या शिक्षणासाठी, समाज कल्याणासाठी अतोनात संघर्ष केले हे काय आपल्याला माहित नाही का? हे संघर्ष करताना तिची एकच इच्छा होती ती म्हणजे आपल्या समाजाच्या लेकी शिकाव्यात, तिला तिचे स्थान मिळावे.**

ज्या यातना तिच्या वाटेला आल्यात त्या कुणा दुसऱ्या मुलीच्या वाटेला नको यायला म्हणून तिने तिचे सुख गहाण टाकले. एवढ्या दशकानंतरही समाज बदलला नक्की बदलला पण कसा हो, बदलत्या समृद्ध देशाच्या आरशामागे तिच्या व्यथेची प्रतिमा अजूनही जशीच्या तशीच आहे. कुठे बदलली हो ही स्त्री कुठे मिळाले हो तिला स्वातंत्र्य, कुठे फळाला आला हो सावित्रीचा संघर्ष इथे एक स्त्री नावा रूपाने एक आदर्श म्हणून जेव्हा उभी राहते, तेच दुसरीकडे ती श्वापदांची शिकार होते, तिच्या देहाची लक्तरे ही श्वापदे करतात कसा विकसित झाला गं! सावित्रीडे तुझा समाज तू सोसलेल्या झळा, यातना, टिका, अत्याचार, विद्रोह आजही ही स्त्री भोगतीच आहे. हा फक्त तिच्या अत्याचाराला सुशिक्षितपणाचा शिक्का लागला आजही ती आपल्या व्यथा कुणाला मोकळेपणानं सांगू शकत नाही. हे चित्र बदलायला हवं. नको तो अत्याचार नको ती वेदना तिला द्या मान, करा तिचाढ सन्मान, जेव्हा या देशातील स्त्री अभिमानाने चालू शकेल, सुरक्षित होईल तेव्हा हा देश समृद्ध आणि विकसित होईल. या देशाचा कणा ही स्त्री आहे. त्यामुळे तिला हा मान देणे आवश्यक आहे, आज संकल्प नको शपथ घ्यायला हवी सावित्रीचे संघर्ष आपण जपले तर खऱ्या अर्थानी तिला ही मोठी मान वंदना असेल आणि तेव्हा माना खाली झुकतील त्या फक्त आदरापोटी शर्मेने नाही.

एकविसाव्या शतकात सावित्रीला मानवंदना ही तिच्या स्वप्नाला सत्यात उतरून देण्यात आली तर ती किती उत्तम असेल हो पण आता स्त्री विषयीची बाजू मांडताना आपण तिच्या ताकदीला कडेलोट करून चालणार नाही, समाजाला समजूत देणे ही एक औपचारिकता आहे, पण तिचा संघर्ष हा तिलाच करावा लागणार हे तिने जाणले पाहिजे, दुसऱ्याची आधाराची काठी ती सहज होते आणि जेव्हा स्वतःला आधार देण्याची वेळ येते तेव्हा ती खचून का जाते. चूल, मूल संभाळते आणि हा समाज सुध्दा आपल्या इच्छा आकांक्षाना दूर ठेवून आपल्या घरातील कुटुंबाच्या इच्छा पूर्ण करणे, स्वतःसाठी कधीतरी काढेल वेळ असं म्हणत दिवसागणिक वर्ष सरते, पण तिला स्वतःला भेटतच नाही, आपल्या स्वप्नाचा होम स्त्री किती सहजपणे करते. पण तिचे स्वप्न जपणारा ज्योतीराव तिच्या पाठीशी असतोच असे नाही, आजच्या स्त्रीला साथ देणारा ज्योतीराव मिळाला तर प्रत्येक स्त्री ही सावित्रीसारखी घडेल, तीला फक्त शिकून चार भिंतीत बंदिस्त करण्याची वृत्ती बदलली तर ती ही पुढे जाईल, मग देशातील फक्त बोटावर मोजता येईल एवढ्याच स्त्रीया कर्तृत्ववान न होता संपूर्ण स्त्री वर्ग विकसित होईल. सुरूवात ही कुठून तरी व्हायलाच हवी. तेव्हा बदल घडेल. मग किती दिवस फक्त आपण वाट पहावी, करूयात नवीन सुरूवात बदलून टाकू जूनी विचारधारा आणि स्थान देऊ नव्या विचारांना हा पण ते ही थोरांच्या ज्ञानाने प्रज्वलित झालेले असावे.

सावित्री जेव्हा या देशात नव्या विचारांने आणि आचारांने जन्मला येईल तेव्हा तिचा आदर्श सार्थक होईल आणि तिचे प्रयत्न देखील. ज्योतिबा आणि सावित्रीचे कष्ट नव्याने अंकुरीत होईल.

# क्रांतिज्योती सावित्रीमाईंचे विचारधन आपली संपत्तीच !



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**सावित्रीमाई फुले यांचा जन्म आजच्या दिवशी म्हणजेच दि.३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव खंडोजी नेवसे- पाटील तर आईचे नाव लक्ष्मीबाई होते. सावित्रीमाईंची जयंती महिला मुक्ती दिन म्हणूनही साजरी केली जाते. सावित्रीमाईंना महात्मा जोतिरावजी फुलेंनी शिकवले आणि स्त्री शिक्षणाचा पाया रचला. आज सावित्रींच्या लेकी जगात सर्वत्र सर्व क्षेत्रांत आघाडीवर आहेत. याची सुरुवात सावित्रीमाईंमुळे झालेली आहे. कारण त्यांनी शिक्षणमंत्रच आपल्या काव्यसंग्रह- काव्यफुलेमधून दिला-**

**"विद्या हे धन आहे रे, श्रेष्ठ साऱ्या धनाहून।**
**तिचा साठा जयापाशी, ज्ञानी तो मानती जन॥"**

म.जोतिरावजी फुलेंचे मूळ आडनाव गोरे होते. पण पेशव्यांनी त्यांचे वडील गोविंदराव फुले यांना पुण्यातल्या फुलबागेची जमीन बक्षीस दिली. म्हणून त्यांचे कुटुंब पुण्यात आले. त्यांच्या फुलांच्या व्यवसायावरून त्यांचे आडनाव फुले असे पडले. जोतिरावांचा सावित्रीमाईंशी विवाह झाला, तेव्हा त्या अवघ्या ९ वर्षांच्या होत्या. शिक्षणसम्राट जोतिरावजी फुले स्वतः शिकले आणि त्यांनी सावित्रीमाईंना शिकवले. दि.१ मे १८४७ रोजी म्हणजे स्वातंत्र्यापूर्वी १०० वर्षांआधी सावित्रीमाईंनी पुण्याच्या मागास वस्तीत एक शाळा काढली. ही त्यांची पहिली शाळा आणि दि.१ जानेवारी १८४८ रोजी भिडे वाड्यात जोतिराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली. दलितांच्या व्यथा-वेदना मांडणारी पहिली कवयित्री म्हणून त्यांना अग्रमान द्यायलाच हवा!

**"इंग्रजी माऊली देई सत्य ज्ञान। शूद्राला जीवन देई प्रेमे॥**
**इंग्रजी माऊली शूद्रांना पान्हा पाजी। संगोपन आजी करतसे॥**
**इंग्रजी माऊली तोडते पशुत्त्व। देई मनुष्यत्त्व शूद्रलोका।।"**

**ज्ञानज्योती फातिमाबी शेख याही त्यांच्यासोबत शिक्षिका** म्हणून कष्ट उपसत होत्या. ही सर्वार्थाने मुलींची पहिली शाळा ठरली. मागास वस्तीतील शाळा काही दिवसात बंद पडली. या शाळेत सावित्रीमाई मुख्याध्यापिका झाल्या. सावित्रीमाईंना कणाकणातून ज्ञान वेचायला शिकवणाऱ्या जोतीबांचा त्यांच्या जीवनपद्धतीवर सर्वात मोठा प्रभाव होता. ते काव्यसुमनातून सांगताना त्यांनी लिहिले-

**"काळरात्र गेली। अज्ञान पळाले॥ सर्वे जागे केले। सूर्याने या॥**
**शूद्र या क्षितिजी। जोतीबा हा सूर्य॥**
**तेजस्वी अपूर्व। उगवला॥"**

सावित्रीमाईंच्या या शाळेत सुरुवातीला फक्त सहा मुली होत्या. वर्षभरात ही संख्या जेमतेम ४५ पर्यंत पोहोचली. शाळा काढून मुलींना शिकवायला सुरुवात केली म्हणून



सनातन्यांनी आणि उच्चवर्णीयांनी "धर्म बुडाला. जग बुडणार" अशी फुले दांपत्यावर टीकेची झोड उठवली. सावित्रीमाईंच्या अंगावर शेण, दगड व विटा फेकले. काही उन्मत्त लोक तर त्यांच्या अंगावर धावून गेले. बहिष्कारही घालण्यात आला. तरीही त्या डगमगडल्या नाहीत. स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे, हे त्यांनी ओळखले. आता त्या अधिक उत्साहाने कामाला लागल्या. सन १८५४ सालीच अस्पृशोद्धारक जोतीरावांना ज्ञानसूर्याची उपमा देऊन सावित्रीमाईंनी त्यांच्या महानतेची प्रचिती दिली-

***"स्वामी जोतीबांच्या लागे मी चरणी!***
***त्यांची गोड वाणी मनी घुमे!!***
***महार मांगाची करते मी सेवा!***
***आवडीच्या देवा स्मरूनिया!!"***

केवळ मुलींना शिक्षण देऊन भागणार नाही. अपप्रवृत्तीविरुद्ध लढले पाहिजे. बाल-जरठ विवाह प्रथेमध्ये अनेक मुली वयाच्या १२-१३व्या वर्षी विधवा होऊ लागल्या. अशा मुलींना नवऱ्याच्या चितेवर उडी टाकून सती जावे लागे किंवा त्यांचे केशवपन करून त्यांना कुरूप केले जाई. या सर्व दुष्ट प्रथेला त्यांनी कडाडून विरोध केला आणि शिक्षणसम्राट म.फुलेंनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीमाईंनी ते समर्थपणे चालवले. एवढेच नव्हे तर बलात्काराने गरोदर राहिलेल्या महिलांचे बाळंतपण त्या स्वतः करत होत्या. याच ठिकाणी काशीबाई या ब्राम्हण विधवेचे मूल फुले दांपत्यानी दत्तक घेतले आणि त्याचे नाव यशवंत ठेवले. अशा या महान सावित्रीमाईंची काव्य फुले आणि सावित्रीमाईंची भाषणे ही पुस्तके प्रसिद्ध झाली. बहुजनांना अज्ञानाच्या गाढ झोपेतून गदागदा हलवून जागे करताना त्यांनी लिहिले-

***"बंदी मनुची विद्या घेण्या होती ती उठली।।***
***ज्ञानदाते इंग्रज आले विद्या शिकूनी घ्या रे।।***
***ऐसी संधी आली नव्हती हजार वर्षे रे।।***
***मुलाबाळांना आपण शिकवू आपणही शिकू।।***
***विद्या घेऊनी ज्ञान वाढवून नीतीधर्म शिकू।।***
***नसानसातून ईर्षा खेळवू विद्या मी घेईन।।***
***शूद्रत्वाचा डाग हा माझा निपटून काढीन।।***
***राज्यात बळीच्या आम्हास विद्या घडो।।***
***यशाची आमच्या दुंदभी नगारे झडो।।***
***'इडा पिडा टळो' या कार्यी भट न पडो।।***
***असे गर्जूनी विद्या शिकण्या जागे होऊन झटा।।***
***परंपरेच्या बेड्या तोडुनी शिकण्यासाठी उठ।।"***

काव्यफुलेच्या माध्यमातून रंजल्या-गांजलेल्या दलित-पीडित समाजाला शिक्षणामृत पाजणाऱ्या राष्ट्रपितामह क्रांतीबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांचे विचारधन हीच आपली संपत्ती नव्हे का? प्लेगने बाधीत रुग्णांची सेवा करताना सावित्रीमाईंनाच प्लेगची लागण झाली. दि.१० मार्च १८९७ रोजी त्या निर्मिकांकी कायमच्या निद्रिस्त झाल्या.

# आद्यशिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले !



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**मूलतः मानवी उत्क्रांतीचे गमक काय असेल आणि त्यात तत्कालीन स्त्रीची भूमिका काय असेल (?) याचा सद्सद्विवेक बुद्धीने विचार केला असता मानवी उत्क्रांतीच्या केंद्रस्थानी स्त्रीच होती! याचे कारणही तसे मजेशीर आहे आणि ते म्हणजे पुरुषाचे पौरुषत्व कितीही बलशाली असले तरी स्त्रीच्या मातृत्व-वात्सल्याशिवाय गत्यंतर नाही हे वैश्विक सत्य स्विकारावेच लागेल!**



अगदी ह्याच क्रांतिकारक विचारांची खुणगाठ मनासी बांधून समाजपरिवर्तन करण्यासाठी एक तरुण घराबाहेर पडला, ते म्हणजे महात्मा ज्योतीराव फुले! अत्यंत कठीण काळात ज्योतीराव धर्मबेडीत आणि वर्णव्यवस्थेच्या विषारी विळख्यात अडकलेल्या एकोणिसाव्या शतकातील समाजाला बाहेर काढण्यासाठी पुण्यासारख्या शहरात पाय रोवून उभे राहिले. त्यासाठी वाटेल ती किंमत मोजण्याची त्यांची तयारी होती. या कार्यात त्यांना खंबीर आणि कृतीशील विचाराने साथ दिली ती त्यांच्या अर्धांगिनी सावित्रीबाई फुलेंनी! आपल्या दारातील पाणवठा सर्वांसाठी खुला करून ज्योतीराव अगोदरच घरातून बहिष्कृत झाले होते, आणि त्यात कळस म्हणजे त्यांनी स्वतःची पत्नी साक्षर करून पुण्यातील मुलींना शिकवण्यास तयार केल्यामुळे तत्कालीन रूढी-परंपरांनी बरबटलेल्या समाजातील तथाकथित सुधारणावाद्यांचा तिळपापड झाला!

सामाजिक परंपरेच्या सर्वच्यासर्व चौकटी भेदून ज्योतीरावांनी प्रथम अशिक्षित असलेल्या आपल्या पत्नीला साक्षर केले. चांगल्या कामाची सुरुवात आपल्या घरातूनच झाली पाहिजे या न्यायाने सावित्रीबाईंना शिकवून तयार केले. लोक काय म्हणतील? याचा तिळभरही विचार केला नाही आणि कुणाची भीतीही बाळगली नाही, याचे कारण म्हणजे स्वतः ज्योतीराव लहूजी वस्ताद साळवे यांच्याकडे कुस्तीचे धडे घायचे! ज्योतीरावांची बलदंड शरीरयष्टी आणि परखड विचार विरोधकांच्या काळजात धडकी भरवायचे! ब्राह्मणांचे कसब, शेतकऱ्यांचा आसूड सारख्या ग्रंथातून त्यांनी इथल्या व्यवस्थेवर घणाघात केले होते. स्वतःच्या घरातून परागंदा झालेले ज्योतीराव खरे धर्म चिकित्सक झाले! सत्यशोधक समाजाच्या "सार्वजनिक सत्यधर्म" हा ग्रंथ प्रमाण मानून ज्ञानोबा-तुकोबांच्या अभंगांसारखे त्यांनी अखंड लिहून इथल्या थोतांड, कर्मकांडांनी त्रस्त झालेल्या व्यवस्थेला सडेतोड प्रश्न विचारून अनेकवेळा निरुत्तर केले. याचा दूरगामी प्रभाव सावित्रीबाईवर झाला नसेल तर नवल!

सावित्रीबाई फक्त साक्षर होऊन थांबल्या नाहीत, तर वयाच्या सतराव्या वर्षी पुण्यासारख्या प्रस्थापित विचारांच्या आणि प्रतिगामी विचाराने बरबटलेल्या लोकांमध्ये शिक्षिका म्हणून भिडे वाड्यात मुलीना शिक्षण द्यायला लागल्या! ही अलौकिक घटना भारताच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यासारखी असून इथून पुढे भारताच्या संपूर्ण इतिहासानेच अक्षरशः कूस बदलली! एक स्त्री असून प्रस्थापित व्यवस्थेच्या छाताडावर पाय देऊन आपले ज्ञानदानाचे महान कार्य करतांना पाहून प्रस्थापितांचे डोळे दिपल्याशिवाय राहिले नाहीत! धर्ममार्तंडांनी धर्म बुडाला, कलीचा प्रभाव सुरु झाला, आता संपूर्ण देश अधोगतीला जाणार, जगबुडी होणार! अशा वावड्या उठवून फुले दांपत्यास शिव्यांची लाखोली वाहिली! प्रस्थापित लोकांच्या जगण्याचा अक्षरशः तिळपापड झाला! एवढ्यावरच हे द्वेष्टे थांबले नाहीत. त्यांनी ज्ञानदानास जाणाऱ्या सावित्रीबाईंना अर्वाच्य शिव्या द्यायला प्रारंभ केला! तरीही थांबत नाहीत हे पाहून अंगावर शेण, चिखल, सडके टमाटे, अंडे मारले! तरीही सावित्रीबाई थांबल्या नाहीत, तेंव्हा त्यांनी अक्षरशः त्यांना दगड मारले! सावित्रीबाईंच्या डोक्याला जखमा झाल्या, लुगडे रक्तबंबाळ झाले, मात्र आपले ज्ञानदानाचे महत्कार्य त्यांनी थांबवले नाही!

एवढं सगळं सोसून सावित्रीबाई ज्योतीरावांच्या "विद्येविना मती गेली" या काव्याने प्रभावित होऊन काव्यफुले, सुबोधरत्नाकर, बावनकशी हे ग्रंथ लिहून तत्कालीन समाजाचे मूलगामी प्रबोधन करण्याचे महत्कार्य केले! आपल्या काव्यफुले या काव्य संग्रहात त्या संबंध मानवांना प्रश्न विचारतात.

ज्ञान नाही विद्या नाही, ते घेणेची गोडी नाही
बुद्धी असुनि चालत नाही, तयास मानव म्हणावे का?

हे शब्द वाचल्यानंतर आपली सर्वांचीच जबाबदारी किती मोठी आहे? हे लक्षांत येते. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या सावित्रीबाईंची प्रतिभा आणि काव्य सृष्टीचा शोध घेतला असता अनेक महत्वपूर्ण प्रश्न त्यांनी तेंव्हा उपस्थित केले असले तरी आजही ते बऱ्याच अर्थाने लागू होतात यात शंका नाही. आपल्या कवितेतून त्या

बाईल काम करत राही, ऐतोबा हा खात राही
पशु-पक्षांत ऐसे नाही, तयास मानव म्हणावे का?

असे सडेतोड लिहून समाजातील ऐतखावू पुरुषांना काम करायला प्रवृत्त केले! त्यांना लाजेने मान खाली घालून आपले कार्य करण्यास प्रवृत्त केले!

आद्यशिक्षिका, पहिल्या मुख्याध्यापिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे आज जयंतीदिनी स्मरण करतांना आपण मूलगामी विचार करणे गरजेचे आहे! स्त्री म्हणून कोणतेही संरक्षण नसतांना सावित्रीबाईंनी आपल्या जीवाची परवा न करता स्त्री शिक्षणासाठी अहोरात्र प्रयत्न केले. आज एकविसाव्या शतकात बऱ्याच स्तरावर स्त्रीने क्रांतिकारी पाउल उचलण्याची आवश्यकता आहे. आजही स्त्रीचा दुय्यम दर्जा कमी झाला नाही. विवाहासाठी मुलगी पाहणे आणि पुरुषी अहंकाराचे प्रदर्शन अजून थांबले नाही. विवाहासाठी मुलगी आपले माहेर आणि सर्वस्व सोडून पतीच्या घरी नांदायला जात असतांना हुंडा पद्धती बंद झाली नाही! उच्च शिक्षित मुलगा-मुलगी असतांना वरपक्षाकडील लोकांना लाखात हुंडा मागायला जराशीही लाज कशी वाटत नाही? कमावती मुलगी असतांना आणखी वर हुंडा मागतात! हा समाजाला लागलेला कलंक पुसून टाकायचा असेल तर सावित्रीच्या लेकींनी हुंडा घेणाऱ्या दलालासोबत लग्न करण्यास जाहीर नकार द्यायला हवा! समाजातील शिकलेल्या लोकांनी संपूर्ण नैतिक मर्यादांचे उल्लंघन केले असून मुलीच्या बापाला आणि मुलांना दुय्यम समजून त्यांची शिकले सवरले लोकच अवहेलना करत आहेत! हा समाजाला लागलेला मोठा कलंक असून यासाठी सावित्रीबाईंचा वसा-वारसा घेऊन हुंडा घेणाऱ्या मुलांचे प्रस्ताव धुडकावून लावावे लागतील! तेंव्हाच मुलांच्या बापाचे डोळे खाडकन उघडतील!

हुंडा मागण्यात स्त्रियाच अग्रेसर असतात हा स्त्री जातीला लागलेला कलंक स्वतः स्त्रीनेच पुसून टाकायला हवा आणि आपण सावित्री-जिजाऊ यांच्या वारस आहोत हे सिद्ध करावे लागेल! असे झाल्यास अपोआप स्त्री-पुरुष हा भेद मावळून जाईल! कोणत्याही आईच्या गर्भात स्त्रीचे भ्रूण मारले जाणार नाही. त्यासाठी मी देशातील तमाम मातृशक्ती-स्त्रीशक्ती यांच्या चरणावर मस्तक ठेवून कळकळीचे आवाहन करतो की; कृपया स्त्रीला दुय्यम मानू नका! तीचा सन्मान करा! तीच आपल्या घरातील लक्ष्मी आहे! तिच आपले पालन-पोषण करणारी अनंतकाळची माता आहे! तिच्या गर्भात आपले भविष्य वाढणार आहे! असे झाल्यास खऱ्या अर्थाने आपण सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी केल्याचे समाधान वाटेल! तसेच मुलगा-मुलगी भेद संपवून समाजात स्त्री-पुरुष समानतेचे विचार प्रसारित करावे लागतील. काही माणसे बोलतांना सहजच "त्यांना मुलगा नाही" असे बोलून जातात, हे भयंकर आहे! हे कुठेतरी थांबले पाहिजे! आज संपूर्ण जग मंगळावर जाण्याच्या तयारीत असतांना आपण जर स्त्री-पुरुष, पत्रिका, शकून-अपशकून यात अडकून बसलो तर आपला देश आणखी मागे जाईल! तेंव्हा, चला बंधू-भगिनींनो, आज स्त्री-पुरुष समानतेचा मुलभूत विचार गाठीशी बांधू आणि सावित्रीबाई फुलेंच्या कार्याला, स्मृतीना सन्मानाने विनम्र अभिवादन करूया! जय ज्योती! जय सावित्री! जय क्रांती!

# फॅन्सी नंबर प्लेटचे फॅड वाढले!

आधुनिक केसरी

सध्या सर्वत्र दुचाकी, चारचाकी वाहनांवर फॅन्सी नंबर प्लेटचे फॅड दिसू लागले आहे.दादा,मामा,वा अन्य नावाच्या वेगवेगळ्या आकारात फॅन्सी नंबर प्लेट मुळे मुळ नंबरप्लेट ओळखणे अवघड बनले आहे.

संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे.बहुतांश वाहनांवर सरकारी नियमानुसार नंबरप्लेट नाहीत. प्रतिष्ठेपायी वा फॅशन म्हणून अशा प्रकारचे नंबरप्लेट बनवितात त्यामुळे वाहनांचा नंबर कोणता आहे .ते समजत देखिल नाही.अशा नंबरप्लेट आढळल्य तर नव्या नियमानुसार पाचशे ते हजार पर्यंत दंड आकारला जातो.

सध्या सर्वत्र शहरी असो वा ग्रामीण भागांमध्ये फॅन्सी नंबरप्लेट बनवण्याचे फॅड वाढले आहे.अशा नंबरप्लेट मुळे गाडी क्रमांक ओळखता येत नाही.ही वस्तुस्थिती आहे.प्रत्येक जागरूक नागरीकांनी सुचनांचे पालन करून सहकार्य केले पाहिजे.नियम डावलले जाणार तर नाहीना याची काळजी पाहिजे.अशा प्रकारच्या नंबरप्लेट आढळल्यास संबंधित विभागाने तात्काळ कारवाई करणे गरजेचे आहे.त्याचबरोबर नियमांचे उल्लंघन केल्यास परवाने रद्द करावेत.

मुळ क्रमांक वाहनांवर असणे आवश्यक आहे.पेंट करून किंवा रेडियमचा वापर करून फॅन्सी नंबर प्लेट बनवण्याचा कल वाढला आहे.वाहनांची नंबर प्लेट कशी असावी हे मोटार वाहन कायद्याने निश्चित करुन दिलेले आहेत.तरीही सर्वत्र फॅन्सी नंबर प्लेटचे फॅड वाढले आहे. अशा नंबरप्लेट लावणे चुकीचे आहे.संबंधीत विभागाने याकडे तत्काळ लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

अशा नंबरप्लेट आढळल्यास तत्काळ कारवाई करावी.तसेच नियमांचे उल्लंघन केल्यास परवाने रद्द करावेत तेव्हाच कुठे आळा बसेल .



# अबब... ६ वी च्या मुलाला १ लाख ८० हजार फी

## शासकीय सैनिक शाळेतील अवाढव्य फी कमी करण्याची पालक महासंघाची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्रातील चंद्रपुर व सातारा शासकीय सैनिक विद्यालयात शासनाकडुन दिल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी यासाठी अखिल भारतीय शासकीय सैनिक शाळा पालक संघांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर,सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार,विरोधी पक्ष नेते अजित पवार ,खासदार अशोक नेते व आमदार किशोर जोरगेवार,आमदार बंटीभाऊ भांगडीया इत्यादी महोदयांना निवेदनाद्वारे विनंती करण्यात आली आहे.

भारत देशातील सैन्यामध्ये कुशल अधिकारी बालपणापासुन घडविण्यासाठी प्रत्येक राज्यात किमान एक सैनिक स्कुल स्थापन करण्याची संकल्पना भारत सरकारने आखली ही अभिनंदनीय बाब आहे आणि त्या योजनेनुसार महाराष्ट्रात देशातील पहिले सातारा येथे व चंद्रपूर येथे देशातील पहिले अत्याधुनिक सैनिक स्कुल अस्तित्वात आहे. साताऱ्यात १ लाख ४० हजार तर चंद्रपुरात १ लाख ८० हजार फीज असल्याने गरिबांची मुले गुणवत्ता यादीत येऊन देखील शिक्षण घेऊ शकत नाही त्यामुळे फीज कमी करण्याची मागणी संघटनेने केली आहे.

इतर राज्याच्या तुलनेत शिष्यवृत्ती कमी असून जिल्हा परिषद शिक्षकांच्या पाल्यांना ३२७ रुपये शिष्यवृत्ती ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे तसेच शाळेची असलेली अवाढव्य फी व मिळणारी तुटपुंजी शिष्यवृत्ती यामुळे ते विद्यार्थी प्रवेश घेऊ शकत नाहीत व त्यांचे स्वप्न पुर्ण होऊ शकत नाही. समाजकल्याण विभाग व शालेय शिक्षण विभागाची शिष्यवृत्ती रक्कम त्वरीत मंजुर करण्यात यावी. महाराष्ट्र राज्यातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील अनु. जाती / जमाती / इतर मागास वर्ग आणि शालेय शिक्षण विभाग शिष्यवृत्ती योजना त्वरीत मंजुर करण्यात येवुन मुलांना एक उत्तम सैनिक शाळेत शिक्षण मिळुन देशाची सेवा करण्याची संधी मिळावी अशी निवेदनाद्वारे अखिल भारतीय शासकीय सैनिक शाळा पालक महासंघाचे अध्यक्ष नवनाथ धांडोरे, सरचिटणीस दुशांत निमकर, कार्याध्यक्ष उमाजी कोडापे,रत्नाकर चौधरी, मोटे सर, उदगिरकर साहेबराव, मनोहर आंबोरकर, अमित झाडे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

"सैनिक शाळेत शिकणाऱ्या जिल्हा परिषद शिक्षकांच्या पाल्यांना ३२७/- रुपये शिष्यवृत्ती ही लाजिरवाणी बाब असून ती पूर्णत: बंद करण्यात यावी वा त्यात वाढ करण्यात यावी तसेच या शिष्यवृत्ती बाबत वाढ न झाल्यास केंद्र स्तरावर देखील पाठपुरावा करू.
**-दुशांत निमकर सरचिटणीस, अखिल भारतीय शासकीय सैनिक शाळा पालक महासंघ**

सैनिक शाळेची प्रवेश परीक्षा १५ हजार विद्यार्थी देत असतात त्यापैकी ८० विद्यार्थ्यांची निवड केली जाते .अवघड परीक्षा देऊन ही पावणे दोन लाख रुपये फी ? ? गरिबांनी सैनिक शाळेत प्रवेश घ्यायचा नाही का ? ?शासनाने शिष्यवृत्तीमध्ये वाढ करावी किंवा फी कमी करावी अन्यथा येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पालक महासंघाच्या वतीने आंदोलन करण्यात येईल.
**-नवनाथ धांडोरे, अध्यक्ष, अखिल भारतीय शासकीय सैनिक शाळा पालक महासंघ**

# कन्नड तालुक्यातील 'हनुमाननगर' येथील मिनी अंगणवाडीसाठी हरवली

## अहो कोणी शोधून देता का ? अंगणवाडी बंद मात्र कागदोपत्री चालू..!



आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील हनुमाननगर येथील मिनी अंगणवाडी कन्नड -सिल्लोड रोडवर लोक वस्ती हनुमान नगर गाव आहे व इथून रामनगर गाव 3 किमी अंतरावर आहे, येथील बालकांना येथे जाणे शक्य नसल्याने हनुमान नगर येथेच मिनी अंगणवाडी मंजूर करून येथे एक अंगणवाडी सेविकापद भरले आहे, हे पद फक्त कागदपत्रे पुरतीच आहे. या ठिकाणी अंगणवाडी भरत नाही हे अंगणवाडी वास्तव नावालाच उरली आहे.

मिनी अंगणवाडी सेविका यांच्या पतीला विचारणा केली आसता. ते म्हणाले आम्ही आता कुठे वर्ग भरवू ? तुम्हाला पाठवयाचे असेल मुले तर पाठवा नसता तुमची मर्जी ? असे प्रतिउत्तर मिळाल्याने पालक वर्ग संभ्रमित झाले आहेत. कसेही करून हनुमान नगर येथे भरवा अशी विनंती केली असता नाकार दिला. त्यामुळे थेट बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांना केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, बालकांना दोन -तीन किमी जाणे शक्य नाही, बालविकास प्रकल्प अधिकारी यांना दूरध्वनीद्वारे संपर्क साधून फोनद्वारे माहिती देण्यात आली होती. दोन महिन्यांपासून आम्हाला उडवीचे उत्तर दिले सदरील बाबी चिंताजनक आहे, लहान मुलांचे भवितव्यचा प्रश्न निर्माण होत ? या परिसरातील मुलांना पोषक आहार वेळेवर मिळत नाही, शासनाकडून आलेला आहार गेला कुठे ? व आहाराअभावी मुलांना कुपोषित किंवा अपंग या सारख्या आजराला बळी पडल्यास जिमेदार कौन राहिल ? हनुमान नगर तालुका कन्नड येथील नागरिकांनी लेखीपत्राद्वारे बालविकास अधिकारी यांना करण्यात आली असून लवकर मिनी अंगणवाडी सूरु करण्याची मागणी अरुण निकम, विशाल नलावडे, अमोल, समाधान, ऋषिकेश व इतर यांनी केली आहे. एकीकडे शासन मोठा गाजा करीत मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत मात्र प्रत्यक्ष ग्रामीण भागातील पालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. पालकांनी आणि गावकऱ्यांनी अंगणवाडी रामनगर येथे चालू व्हावी या करिता खूप प्रयत्न केले. ती मान्य करून रामनगर येथील मान्यताप्राप्त अंगणवाडी भरवली ही जात होती मात्र अचानक बंद झाल्यानंतर गावकऱ्यांच्या लहान मुलामुलींच्या मुलांना शिक्षणपासून वंचित केल्यामुळे ग्रामस्थ संबंधित विभागाच्या विरोधात रोष ची भावना व्यक्त करीत आहे, अंगणवाडी पूर्ण मान्यता प्राप्त आहे, तरीही बंदच आहे ही अंगणवाडी लवकरात लवकर सूरु करण्यात यावी नसता लोकशाहीच्या मार्गाने दाद मागितली जाईल, असा इशारा येथील ग्रामस्थानी दिला आहे.

# प्रा. डॉ. संजय गायकवाड यांना सावित्रीमाई फुले गुणगौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील - पिशोर



येथील महात्मा जोतिबा फुले कला व विज्ञान कनिष्ठ विद्यालय चे प्रा . डॉ. संजय गायकवाड यांना महाराष्ट्राचा राज्याचा क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त झाला. डॉ. गायकवाड हे २४ तास इंग्रजी विषयाचे कार्य करत आहेत. लेखन आणि व्याख्यान हे व्यक्तिमत्त्वाचे दोन शब्द त्यांचे पैलू आहेत . एक उपक्रमशील तथा नवोपक्रमशील शिक्षक म्हणून ते परिचित आहेत. कोविड- १९ अनुभव एका तासाच्या एज्युकेशनच्या वेळी त्यांनी शिक्षणाला वेग दिला आहे. या कार्याची सत्ता सुरक्षित महाराष्ट्र माध्यमिक माध्यमिक क्रांतिज्योती साविमाई फुले गुणगौरव पुरस्कार जिंकला आहे . सावित्रीमाई फुले यांच्या १२५ व्या जयंती संधी ३ जानेवारी रोजी मुंबई येथे या परस्काराचे वितरण केले जानार आहे अशी माहिती मिळत आहे, तसेच प्रा गायकवाड़ हे त्यांच्या स्वभावामुळे व इंग्लिश भाषा ही सरळ व सोपि पद्धतीने कसी शिकता येईल या बाबत अनेक प्रसार माध्यमातून ते मार्गदर्शन करतात,त्यांना मिळालेल्या पुरस्कारा मुळे पिशोर नगरी व तालुक्याभरातुन त्यांचे कौतुक केले जात आहे.



# धर्माबादेत लाखो रुपयाचे प्लास्टिक साहित्य जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** प्लास्टिक बंदीच्या संदर्भात धर्माबाद नगरपालिका पथकाने आज सायंकाळी पावणे सातच्या सुमारास धाडसी कारवाही करत शहरात प्लॅस्टिक पिशव्या, ग्लास, पत्रावळी पुरवणारा ऑटो पकडल्यामुळे सर्वांचे धाबे दणाणले असून लाखो रुपयांचे प्लास्टिक साहित्य जप्त केले असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सदरील वृत्तलेपर्यंत चालू होती. या कार्यवाहीत मुख्याधिकारी सौ.नीलम कांबळे, कार्यालयीन अधीक्षक तुंगनवार, अशोक घाटे, रुक्माजी भोगावार, मेहर, सूर्यवंशी यांच्यासह इतर कर्मचारी होते.

# प्रकाश क्षीरसागर यांना संकल्प फाउंडेशनचा पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**पणजी :** तिरपण येथील संकल्प फाउंडेशनतर्फे महागाव येथे गोमंतकीय साहित्यिक प्रकाश रामचंद्र क्षीरसागर यांना संकल्प साहित्य पुरस्कार हल्लीच प्रदान करण्यात आला, यावेळी संकल्प फाउंडेशनचे अध्यक्ष युवराज युवराज सरनोबत, दै. लोकमतचे संजय पाटील व आसपासच्या परिसरातील सरकारी अधिकारी आणि मोठ्या प्रमाणात शालेय विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या, संकल्प फाउंडेशनचे प्रा. रसूल सोलापूरे यांनी प्रास्ताविक केले. पी. डी. पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. या पुरस्काराने लेखकांना प्रोत्साहन व प्रेरणा मिळेल असे मत वक्त्यांनी व्यक्त केले. प्रमुख पाहुणे बाबासाहेब वाघमोडे यांनी आपल्या भाषणात गडहिंग्लड तालुक्याच्या साहित्य परंपरेचे कौतुक केले. प्रकाश क्षीरसागर यांच्या समवेत चिपळूणचे मुझफ्फर सय्यद, प्रा.डॉ. जनार्दन भोसले, डॉ. देविदास गेजगे यांच्या सह महाराष्ट्रातील वीस साहित्यिकांना गौरविण्यात आले. प्रकाश चौगुले यांनी सूत्रसंचालन केले. युवराज सरनोबत यांनी आभार मानले. यावेळी भारत सातपुते यांचा खास गौरव करण्यात आला.


# मानसी सोनपेठकर यांचे यश

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** संस्कृत भाषा संस्था,



मुंबई या संस्थेने राज्यस्तरीय रामरक्षालेखन स्पर्धेचे आयोजन नुकतेच केले होते. या स्पर्धेत दै. आधुनिक केसरीच्या लेखिका, ख्यातकीर्त संस्कृत शिक्षिका आणि अभिज्ञान, पुणे च्या संचालिका सौ. मानसी चंद्रहासशास्त्री सोनपेठकर यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले आहे. या स्पर्धेत स्पर्धकांनी अचूकपणे संपूर्ण रामरक्षा लिहिणे अपेक्षित होते. सौ. मानसी चंद्रहासशास्त्री सोनपेठकर यांनी या स्पर्धेत संपूर्ण रामरक्षा अचूकपणे लिहिली. त्यांना या स्पर्धेत ९० पैकी ९० गुण प्राप्त झाले. तसेच एम. आय. टी. विद्यापीठ कोथरूड यांचे द्वारे EDUNNOVATION COMPETITION ही स्पर्धा माजी विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत देखील सौ. मानसी सोनपेठकर यांचे सादरीकरण पारितोषिक प्राप्त ठरले आहे. या दुहेरी यशाबद्दल दै. आधुनिक केसरी परिवार तसेच झील एज्युकेशन सोसायटी, ज्ञानगंगा इंग्लिश मिडीयम स्कूल, पुणे आदींनी सौ. मानसी चंद्रहासशास्त्री सोनपेठकर यांचे अभिनंदन केले आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टॅंड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# गोळवलकर, सावरकरांनी छत्रपती संभाजी महाराजांबद्दल केलेले वक्तव्य भाजपला मान्य आहे का ? महेश तपासे

## छत्रपती संभाजी महाराज स्वराज्य रक्षकच होते; अजित पवारांच्या विरोधातील आंदोलन चुकीचे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गोळवलकर गुरुजी आणि सावरकर यांनी त्यांच्या पुस्तकात छत्रपती संभाजी महाराजांबद्दल जे अवमानकारक वाक्य लिहिले आहे ते भाजपला मान्य आहे की नाही हे भाजपने पहिल्यांदा सांगावे आणि मान्य नसेल तर गोळवलकरांचे पुस्तक भाजपची अध्यात्मिक आघाडी जाळणार का हेदेखील सांगावे, असे जाहीर आव्हान राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी दिले आहे. विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्याविरोधात भाजपने पुकारलेले आंदोलन एकदम चुकीचे आहे असेही महेश तपासे म्हणाले. भाजपला छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहासच माहित नाही. छत्रपती संभाजी महाराज हे स्वराज्य रक्षकच होते त्यांनी १२० पेक्षा जास्त लढाया लढल्या व जिंकल्या त्या स्वराज्यासाठीच होत्या याची आठवणही महेश तपासे यांनी करुन दिली आहे. गोळवलकर गुरुजी आणि सावरकर यांनी त्यांच्या पुस्तकात छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल जे अवमानकारक वाक्य लिहिले आहे ते भाजपला मान्य आहे का असा संतप्त सवाल महेश तपासे यांनी केला आहे. राज्यपाल, भाजपचे प्रवक्ते, मंत्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्ये केली त्याचा निषेध विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी विधानसभेत केला. आज भाजप जे आंदोलन करत आहे ते दोगलं आहे आणि अजित पवार यांना जाणूनबुजून बदनाम करण्यासाठी आहे असेही महेश तपासे यांनी स्पष्ट केले. भाजपचे राज्यपाल, प्रवक्ते आणि मंत्री मंगलप्रभात लोढा, चंद्रकांत पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान केला त्यांना नरेंद्र पवार तुम्ही पाकिस्तानमध्ये पाठवणार का? अशी विचारणा करतानाच छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करताना मूग गिळून गप्प का होतात असा संतप्त सवालही महेश तपासे यांनी भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांना केला आहे.



# लासूर स्टेशन येथे रसिकांच्या उदंड प्रतिसादात रंगले कविसंमेलन; जाऊ कवितेच्या गावा...

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** लासूर स्टेशन येथील शब्द सह्याद्री साहित्य प्रतिष्ठानच्या वतीने नववर्षाच्या स्वागत प्रित्यर्थ काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते, संमेलनाचं हे सहावे वर्ष रसिकांच्या उदंड प्रतिसादात संपन्न झाले. निमंत्रित मान्यवर कवी यांच्यासह उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सुरुवातीस नामवंत कवींचा सत्कार करण्यात आला यात कवी बापू दासरी,कवी देविदास फुलारी, शंकर वाडेवाले, प्रा. रागिनी पवार यांचा सत्कार आयोजन समिती व मान्यवरांचे हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ऑनलाईन काव्य स्पर्धेचा निकाल घोषित करून पुरस्कार प्रदान करण्यात आले यात तृतीय क्रमांक क्षमा बर्डे, द्वितीय क्रमांक वैष्णवी साबळे व बाबासाहेब गायकवाड तर प्रथम क्रमांक डॉ. शिवप्रसाद घोडके यांनी मिळवला त्यांचा या ठिकाणी पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल परिसरातील आशिष पवार, ऐश्वर्या सुलाने, प्रा.विशाल गायकवाड,साक्षी नरोडे, गणेश ठोंबरे, प्रणव वाघचौरे, केतन चव्हाण, तेजस डूमाळे, तेजस पानकर, उन्मेश उदावंत, नागेश जाधव, सचिन गोलांडे, मुनवर अली, श्रंखला रत्नपारखी,बबन करंडे, फेरोज शेख, डॉक्टर्स क्रिकेट टीम,उद्धव कवडे यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात कवी देविदास फुलारी यांनी कुठे आहे गाव माझा गाव सांगा ही कविता सादर करून रसिकांची मनी जिंकली तर कवी शंकर वाडेवाले यांनी जीव सये मी ग तुला लावलाय बाई पापणीत झाली कशी काजळाला घाई ही प्रेम कविता सादर केली तर प्राध्यापक रागिनी पवार यांनी रोज लिहावी रोजनिशी अन् मन अतुर व्हावे नाव तुझे मांडता लेखणीने का फितावे ही गझल सादर केली तर कवी बापू दासरी यांनी अज्ञात गावाकडे प्रवासास निघताना ज्या खोलीत विसावला होता तुझा देह ही वडिलांवरील कविता सादर करून प्रेक्षकांना भावविवश केले. या प्रसंगी सरपंच मीनाताई पांडव, उद्योजक प्रीतम मुथा, किरण पाटील डोणगावर, माजी उपसभापती संजय जैस्वाल, माजी उपसपंच गणेश व्यवहारे, शेषराव नाना जाधव, संजय पांडव,जयेश निरपळ, पो.उ. नि. युसुफ शेख, दादाराव तिडके, अविनाश संगेकर, श्रीराम मढीकर, भाऊसाहेब शेळके, सरदार वाबळे, डॉ संतोष साबळे, विशाल शेळके आदींची उपस्थिती होती. येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मैदानात पार पडलेल्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वश्री ज्ञानेश्वर वाघचौरे, डॉ विकास संगेकर, वाल्मीक बळी,प्रशांत दाभाडे, प्रा. शशिकांत सांगवीकर, फेरोज शेख,गोविंद हिवाळे, भास्कर बनसोडे, विठ्ठल नरोडे, मच्छिंद्र पानकर, प्रा राजू शेळके,श्याम शर्मा,मारुती गोलांडे, मच्छिंद्र बडोगे, विठ्ठल मडीकर, डॉ.अशोक ठोळे, प्रकाश सोनवणे, भगवान बनकर, बाबासाहेब जाधव,कल्पेश गायकवाड,सपना गायकवाड,शेषराव जाधव,डॉ. गोपाल धूत, डॉ. शितल धूत, बाबासाहेब कऱ्हाळे,अशोक म्हस्के,यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फिरोज शेख प्रास्ताविक कल्पेश गायकवाड तर आभार मच्छिंद्र पानकर सर यांनी मानले.

# मेथीचे लाडू यंदा महागणार; गोडंबी साडेबाराशे किलो

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** हिवाळा आला की महिला वर्गाला कुटुंबीयांच्या शरीर संवर्धनासाठी पोषक ठरणाऱ्या मेथीचे लाडू बनवण्याचे वेध लागतात. गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा काजू, बदाम, पिस्ता हे ड्रायफ्रूटचे दर तेच असले तरी गोडंबी, अंजीर, खारीक व खोबरे या प्रमुख घटकांचे दर दीडपट ते दुप्पट वाढले आहेत. त्यामुळे मेथीचे लाडू बनवताना गृहिणींचे बजेट वाढणार आहे.

पौष्टिक लाडू म्हणून मेथीचे लाडू घरोघरी बनवले जातात. त्यात काजू, बदाम, पिस्ता, अंजीर, गोडंबी, खारीक, खोबरे, गूळ, खसखस, मेथी या घटकांचा समावेश असतो. काही जण ते तेलात तर काही गावरानी तुपात बनवतात. घरातील प्रत्येक सदस्याला दररोज एक याप्रमाणे लाडू बनवण्याकडे महिलांचा ओघ असतो. यंदा किमान एक ते दीड हजार रुपयांची वाढ प्रत्येक कुटुंबाच्या लाडूच्या बजेटमध्ये होण्याचा अंदाज आहे. जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत हे वाढलेले दर चढते राहण्याची शक्यता व्यावसायिकांकडून वर्तवली जाते आहे. त्यामुळे यंदा मेथीचे लाडू ग्राहकांचा खिसा रिकामा करतील.

**लाडूंमधील या प्रमुख घटकांचे दर वाढले :** गेल्या वर्षी काजूचे दर ६०० ते ८००, बदामचे हजार ते बाराशे, पिस्त्याचे दर बाराशे ते पंधराशेच्या घरात प्रतिकिलो होते. गूळ प्रतिकिलो ६० ते ७० रुपये होता. या सर्वांच्या किमतीत कुठलीही वाढ न झाल्याने तेच आहेत. खोबऱ्याचे दर गेल्या वर्षी २५० रुपये किला होते. यंदा ते ५० रुपयांनी घटून २०० रुपये झाले. मेथीचे दर दहा रुपयांनी घसरून ८० रुपये प्रतिकिलो झाले आहेत. अर्थात, खोबरे व मेथीचे दर घसरले असले तरी इतर घटकांत मात्र वाढ झाली आहे. गोडंबीचे दर गेल्या वर्षी ६०० ते ८०० रुपय किलो होते. त्यात आता दुपटीने वाढ होऊन १२०० ते १४०० रुपयांवर पोहोचले. अंजीर ६०० ते ७०० वरून एक हजार ते साडेबाराशे रुपयांवर गेले आहे. खसखसच्या दरात ५०० रुपयांची वाढ झाली असून ते २५०० ते ३००० रुपये किलोवर पोहोचले आहेत. लाडू बनवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या खोबऱ्याचे दर २०० रुपयांवरून ३०० ते ५०० पर्यंत गेले आहेत. जसजशी थंडी वाढेल तसतसे भाव वाढण्याचाही तर्क लावला जातो आहे.



**प्रत्येक कुटुंबाचा बजेट हजार रुपयांनी वाढणार :** लाडू बनवण्यासाठी एक कुटुंब संख्येनुसार दोन ते तीन किलो साहित्य खरेदी करते . यंदा प्रमुख घटकांच्या किमतीत मोठी वाढ झालेली असल्याने लाडूच्या बजेटमध्ये एक हजार ते दीड हजार रुपयांपर्यंत वाढ होईल .
निलेश गोकुळसिंग राजपूत, किराणा दुकानदार सावळदबारा, ता . सोयगाव






# विजयी खेळाडूंच्या सन्मानार्थ गावकऱ्यांनी काढली बैलगाडीतून मिरवणूक

## महाराष्ट्र राज्यासाठी खेळत पटकावले सुवर्ण व रौप्य पदक

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील खंडाळा येथील विद्यासागर कन्या प्रशालेच्या खेळाडूंनी दमदार खेळी करत सुवर्ण व रौप्य पदक पटकावले असून या विजयाच्या सन्मानार्थ आज दिनांक 2 जानेवारी रोजी खेळाडूंची बैलगाडीतून संपूर्ण गावातून विजयी मिरवणूक काढण्यात आली
नुकतेच कर्नाटक येथील हसन या ठिकाणी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत वैजापूर तालुक्यातील खंडाळा येथील विद्यासागर कन्या प्रशालेच्या खेळाडूंनी बाजी मारत नेत्रदीपक कामगिरी करत सब ज्युनिअर गटात महाराष्ट्र संघांचे प्रतिनिधित्व करत सुवर्ण पदक तर सिनिअर गटात रौप्य पदक पटकावले.तसेच भालाफेक व 100 मीटर अडथळा शर्यतीतही येथील दोन खेळाडूंची महाराष्ट्र ऑलिम्पिक स्पर्धेसाठी निवड झाली आहे.
यात सब ज्युनिअर गटात खेळताना अल्पिता सतीश त्रिभुवन व स्नेहा ज्योतीराम पवार यांनी सुवर्ण पदक पटकावले असून सिनिअर गटात कर्णधार आरती एकनाथ घायवट व सोनल योगेश सूर्यवंशी यांनी रौप्य पदक पटकावले. यात आरती घायवट या खेळाडूस प्लेयर ऑफ द टूर्नामेंट घोषित करण्यात आले असून गीता वेळंजकर भालाफेक तर सोनाली नवनाथ पवार या खेळाडूंची 100 मीटर अडथळा स्पर्धेत महाराष्ट्र ऑलिम्पिक स्पर्धेसाठी निवड झाली आहे.
या विजयाच्या सन्मानार्थ वैजापूर चे आमदार रमेश बोरनारे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस डॉ दिनेश परदेशीं, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब संचेती, माजी आमदार भाऊसाहेब तात्या चिकटगावकर आदी राजकीय,क्रीडा क्षेत्रातील, शैक्षणिक व प्रशासकीय अधिकारी पदाधिकारी यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. आपल्या मुलींनी महाराष्ट्र राज्यासाठी खेळून जिंकून आल्या बद्दल पालक वर्गामध्ये आनंदाचे वातावरण यावेळी बघायला मिळाले तसेच गावकऱ्यांनी आपल्या खेळाडू मुलींचा केलेला सन्मान बघून त्यांच्या पालकांना आनंदाचे अश्रू रोखता आले नाही.
या विजयाबद्दल विजयी खेळाडूंनी मार्गदर्शक क्रीडाशिक्षक बाळासाहेब व्यवहारे यांचे आभार मानले तसेच हा विजय क्रीडा शिक्षक बाळासाहेब व्यवहारे यांच्यामुळे शक्य झाला असल्याचे सांगितले.यावेळी विजयी खेळाडू आरती घायवट, सोनल सूर्यवंशी, गीता वेळंजकर, कृष्णाली वेळंजकर, सोनाली पवार सह क्रीडाशिक्षक बाळासाहेब व्यवहारे,विद्यासागर कन्या प्रशालेच्या सर्व विद्यार्थिनी, शिक्षक,पालक,सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, जिल्हा परिषद सदस्य व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धर्माबादेत भाजपाच्या वतीने अजित पवार यांच्या बेताल वक्तव्याचा निषेध



आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** तालुक्यातील व शहरातील बुथ प्रमुख शक्ती केंद्रप्रमुख, तालुका पदाधिकारी, व विविध आघाडी प्रमुख यांच्या उपस्थितीत भाजपा तालुका अध्यक्ष रविंद्र पोतगंटीवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते अजित पवार यांच्या बेताल वक्तव्याचा निषेध करण्यात आला. महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्षनेते पदी असणाऱ्या अजित पवार यांनी जाणीवपूर्वक छत्रपती संभाजी महाराज धर्मवीर नव्हते असे अपमानजनक व बेताल वक्तव्य केले असून त्या वक्तव्याचा धर्माबाद भाजपाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला व त्यांच्या विरोधात कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी भाजपा तालुका अध्यक्ष रवींद्र पोतगंटीवार यांनी यावेळी बोलताना केली. यावेळी धर्मद्रोही अजीत पवांराचा निषेध असो, बारामतीला सत्तेची सुज छत्रपतींची राखा बुज, मुर्दाबाद मुर्दाबाद अजित पवार मुर्दाबाद अशा गगनभेदी घोषणा देण्यात आल्या. यावेळी सोबत रविंद्र पोतगंटीवार भा ज पा ता अध्यक्ष, साईनाथ शिरपुरे सोशल मीडिया मराठवाडा संयोजक, रामेश्वर गंदलवार शहराध्यक्ष, सनिथ शक्करवार, अशोक पा. वडजे, पिराजी पा. चव्हाण, नारायण पा पवार, नरेश रेड्डी आरकलवाड, सिंध्देश्वर शिवशेट्टे, साईनाथ स्वामी, लक्ष्मण वडणावार, रमेश कुंभारे, सज्जन गड्डोड, ललेश पा मंगनाळीकर, विजय राठोड, गिरीधर बुंदेले, नानक सिंग ढिल्लो, तुकाराम पा महागवळी, शंकर तुनकेवार, नरसारेड्डी येताळकर, हिरामण आरगुलवार, बालाजी बकवाड, माधव समसते, शेषराव साखरे, अंजु बोलमवाड, साईनाथ आरगुलवार, शिवाजी पा. डिग्रसकर व मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# वाढदिवसाच्या खर्चिक कार्यक्रमाला फाटा देत २७७ रुग्णांची तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** वाढदिवसाच्या खर्चाला फाटा देत सर्व रक्कम मोफत आरोग्य तपासणीसाठी खर्च करून साहिल बॅटरीचे साबेर अशरफखान यांनी आदर्श घालून देत सामाजिक भान ठेवले, त्याबद्दल आ. रमेश पा. बोरनारे व सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी त्यांच्या सामाजिक बांधिलकीचा आदर्श सर्वांनी घ्यावा, असे आवाहन केले. साबेर, साहिल बॅटरी, शाहनवाज मित्र मंडळ व आनंद हॉस्पिटल वैजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर नववर्ष दिनी घेण्यात आले. डॉ. अभिजित अन्नदाते, डॉ. अमोल अन्नदाते व त्यांच्या चमूने २७७ रुग्णांची मोफत तपासणी केली. याप्रसंगी बाळासाहब संचेती, साबेरखान, मजीद कुरेशी, अखिल शेख, बाबासाहेब जगताप, शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र साळुंके, स्वप्नील जेजुरकर, दिनेश राजपूत, राजेश गायकवाड, गोकुळ भुजबळ, हिकमतउल्ला, अल्ताफ बाबा, आमिर अली, सलीम वैजापूरी, यांची प्रमुख उपस्थिती होती. आयोजक साबेर अशरफखान, शाहनवाज शाह, जाकीर कुरेशी, बाबा शेख, काजीम पटेल, अतिक शेख,अब्बू शेख, जरू सय्यद यांनी स्वागत केले. सूत्र संचलन व प्रास्ताविक धोंडीराम ठाकूर यांनी केले आभार साबेर अशरफखान यानी मानले.



# नंदलाल काळे राज्य सहकारी दूध महासंघ मुंबईच्या संचालकपदी



आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** औरंगाबाद जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघाचे माजी अध्यक्ष तथा संचालक व पालकमंत्री संदीपान भुमरे यांचे निकटवर्तीय श्री नंदलाल पाटील काळे यांची महाराष्ट्र राज्य सहकारी दुध महासंघ, मुंबई ( महानंद )च्या संचालक पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल पैठण शहरात शहर व्यापारी महासंघाच्या वतीने तसेच बाळासाहेबची शिवसेना पदाधिकारी, तालुक्यातील दुध उत्पादक संस्थेच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक नाथशेठ पोरवाल, पवन लोहिया, बळीराम लोळगे, भाऊसाहेब मापारी, वसंतराव भोसले, सुनील कुलकर्णी, सचिन लखोटीया, जगदीश लोहिया, आनंत लोहिया, कृष्णा मोरे, प्रकाश पवार, अमित नागोरी, अमित सोमानी, उमेश तट्टु यांची उपस्थिती होती.

# खताची सक्ती करणाऱ्यांवर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** शेतकऱ्यांनी कोणते खत विकत घ्यावे, यासाठीही त्यांच्यावर दबाव आणला जातो. कंपन्यांकडून होणाऱ्या या सक्तीचा मुद्दा विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात गाजला. शेतकऱ्यांच्या माथी बोगस खते मारणे हेही शेतकरी आत्महत्येचे एक कारण आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर विशिष्ट कंपन्यांची खते घेण्यासाठी सक्ती करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात येईल, असे मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले. बुलढाणा शहरातील सागर कृषी केंद्रात डेएपी खताची पिशवी शेतकऱ्यांना देण्यासाठी सक्ती करण्यात येत असल्याचा प्रश्न आमदार संजय गायकवाड यांनी प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित केला. याबाबतची तक्रार जिल्हा कृषी अधीक्षकांकडेही करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना अशी सक्ती केल्यामुळे त्यांच्यावर आर्थिक भार वाढत चालला आहे, असे गायकवाड म्हणाले.

# शौर्यदिनी बुद्ध मूर्तीची स्थापना

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शौर्य दिनाचे औचित्य साधून कालकथीत कान्हूजी भिकाजी जाधव यांच्या स्मृतीप्रित्यर्थ वैजापूर तालुक्यातील भटाना या गावातील समाजमंदिरात रविवार, दि. 1 जानेवारी रोजी अखिल विश्वाला शांतीचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या पूर्णाकृती मूर्तीची अनुसयाबाई कान्हूजी जाधव यांच्या हस्ते स्थापणा करण्यात आली. यावेळी या कार्यक्रमास भदंत प्रकाश पठारे यांची मुख्य उपस्थिती होती. याप्रसंगी गावातील ग्रामस्थांपैकी भगवान जाधव, गणेश जाधव, विनायक आल्हाट, रावसाहेब घोडके व ईतर ग्रामस्थ तसेच जाधव कुटुंबातील प्रकाश जाधव, भीमराव जाधव, अशोक जाधव, बाळासाहेब जाधव, विठ्ठल जाधव आणि परिवारातील सर्व सदस्यांची उपस्थिती होती. गावातील भीमशक्ती मित्रमंडळातील विकास जाधव, सुदर्शन जाधव, गौतम जाधव, अमोल जाधव यांनी मेहनत घेतली.



HAPPY NEW YEAR
VISHAL WEIGHING SCALE
SERVICES & CONSULTANTS
GOVT. AUTHORISED DEALAR LICENCE NO. W & M (METRIC) L.D. 23
GOVT. AUTHORISED REPAIRING LICENCE NO. W & M (METRIC) L.R. 251
ALL TYPES OF ELECTRONIC WEIGHING SCALES
OFFICE : NAMANTAR COLONY, N-2, SIDDHARTH NAGAR, HUDCO, AURANGABAD- 431 003,
MOB : 9921589807